# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## सर्व साधारण सभा

शनिवार दि. ३१.१०.२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा.सौ.शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफि अहेमद | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कोकाटे नागाबाई भुजंगराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | बियाणी प्रविण बालाप्रसाद |
| चव्हाण आनंद शंकरराव | फारुख अली खा इलियाज खॉं |
| मुंढे शांता मोतीराम | कल्याणकर बालाजी देविदासराव |
| भवरे किशोर दामोधर | खेडकर प्रमोद मुरलीधरराव |
| कनकदंडें मोहिनी महेशराव | वाजेदा तबसुम अथरअली खा |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| श्रध्दा सुशिल चव्हाण | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| उमरेकर अशोक रावण | मुदिराज कमलबाई रामस्वामी |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजियाबेगम अयुबखान |
| सलिमा बेगम नुरुल्लाखान | गाडगे शंकर जयवंतराव |
| देशमूख वैशाली मिलिंद | देशमूख बाळासाहेब गंगाधराव |
| स.इतरत फातेम स.मजहर हुसेन | गफारखान गुलाम महमंद खान |
| धबाळे गणपत गुणाजी | यादव तुळजाराम गणेशलाल |
| नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| गिल सरजितसिंध पंजाबसिंघ | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| बिपाशा बेगम स.वलिओध्दीन | अ.फसिया फिरदोस |
| अ.सत्तार अ.गफुर | असीयाबेगम अ.हबीब बागवान |
| स.शेर अली स.महेबुब अली | इशरत फातेम अ.शमीम |
| कुरेशी चॉदपाशा खाजा | तबसुम बेगम अ.समद |
| फारुख हुसेन कासिम साब | राखेवार सतिष शेषप्पा |
| चाऊस हसिना बेगम साबेर | अ.लतिफ अ.मजिद |
| जकिया बेगम स.मुखतार | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| खोमणे सुदर्शना महेश | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | अन्नपुर्णा जम्मुसिंह ठाकूर |
| किशोर यादव | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | देशमूख मंगला गजानन |
| प्रा.ललिता मुकूंदराव बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजी |
| येवनकर विजय हिरांचद | कदम विश्वास बालाजी |
| अड.बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर **सौ.शैलजा किशोर स्वामी**, या होत्या. तसेच श्री सुशील खोडवेकर, आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त,(पाणी पुरवठा ),श्री प्रकाश येवले, उपआयुक्त, श्री आर.एस.कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ.असिफ, प्रभारी. मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री महमंद सादिक, मुख्य लेखाधिकारी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य, श्री सुग्रीव अंधारे, अभियंता बिएसयुपी, श्री गिरीष कदम, का.अभियंता सा.बा.वि. डॉ.श्री रईसोध्दीन, पशु वैद्यकिय अधिकारी, श्री रईस पाशा, अग्नीशमन अधिकारी व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व इतर सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **किशोर यादव** | तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष व माझ्या प्रभागातील जेष्ठ सामाजिक,राजकिय कार्यकर्ते श्री नरेंद्रपालजी बरारा यांचे नुकतेच अल्पशाः आजाराने दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव आहे त्यास मान्यता देण्यात यावी. |
| **रामनारायणजी काबरा** | नांदेड नगरपालिकेचे माजी अध्यक्ष श्री नरेंद्रपाल बरारा यांचे नुकतेच दुःखद निधन झालेले आहे, ते नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष असतांना मीही त्यावेळी नगरसेवक होतो त्यांचे काम आम्ही पाहिलेले आहे. ते अत्यंत धडाडीचे कार्यकर्ते होते, त्यांचा नांदेड शहराच्या विकास कामात मोठा हातभार लागलेला आहे त्यांना माझ्या पक्षाच्या वतीने व माझ्यावतीने भावपुर्ण श्रध्दांजली |
| **प्रमोद खेडकर** | तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे माजी अध्यक्ष कै.नरेंद्रपाल बरारा यांचे शहर विकास कामात मोठे योगदान राहिलेले आहे, तसेच शहरात हॉकी गोल्ड कप, क्रिकेट,कुस्ती अशा विविध खेळाच्या स्पर्धाचे आयोजनातही त्यांचा मोठा सहभाग रहात असें त्यांना आमच्या शिवसेना पक्षा तर्फे भावपुर्ण श्रध्दांजली . |
| **आनंद चव्हण** | कै.नरेंद्रपाल बरारा हे तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे नगराध्यक्ष असतांना मी नगरपालिकेचा उपाध्यक्ष असल्यामूळे त्याचे बरोबर मला काम करण्याची संधी मिळाली त्यांची प्रशासनावर मजबुत पकड होती. नगरपालिकेत उत्कृष्ट नपा अधिका-यांना कर्मचा-यांना बक्षिस, देण्याचा उपक्रमही सुरु केला होता अशा थोर नेत्यास आमच्या पक्षातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली, |
| **उमेश चव्हाण** | कै.नरेंद्रपाल बरारा यांना दोन वेळेस नगराध्यक्ष होण्याचा मान मिळाला, ते नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष असतांना सर्व पक्षाच्या नगरसेवकांना विश्वासात घेवून विकास कामाचे निर्णय घेत होते.त्यांना नगरपालिकेने अधिकारी व कर्मचारी मानत होते त्यांच्या नगराध्यक्ष काळातच १८६ रोजंदारी कर्मचारी कायम झालेले आहेत.त्यांना आमच्या पक्षाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली |
| **सरजितसिंघ गिल** | तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष कै.नरेंद्रपाल बरारा यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झालेले आहे. ते नगरपालिकेचे अध्यक्ष असतांना त्याचे तत्कालिन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कै.शंकररावजी चव्हाण, तत्कालिन केंद्रीय गृहमंत्री कै.बुटासिंघजी यांचेशी खुप जिव्हाळयाचे संबंध असल्यामूळे त्यांना शहरात अनेक विकासाची कामे करता आली.त्यांचे क्रिडा क्षेत्रातही मोठे योगदान राहिलेले आहे. त्यांना माझी भावपुर्ण श्रध्दांजली |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | सर्व पक्षाचेतीने नांदेड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष कै.नरेंद्रपालजी बरारा यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. |
| **महापौर** | तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष कै.नरेंद्रपालजी बरारा यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. |

**ठराव क्र.५७** **ठराव**

तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते व क्रिडा प्रेमी कै.नरेद्रपालजी बरारा यांचे नुकतेच दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रदांजली अर्पण करते. तसेच त्यांच्या कुंटुंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

| | |
|---|---|
| **बालाजी कल्याणकर** | गोकुळनगर भागात १८ गाईचा मृत्यू झालेला असल्यामूळे त्या भागातील नागरीकांच्या मनात मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे ,मृत गाईचे पोस्टमार्टम करण्यात आलेले असून पोस्टमार्टम रिपोर्ट काय आलेला आहे याचा खुलासा करण्यात यावा. |
| **गफार खान** | गाईचा इश्यु महत्वाचा नाही. शासनाने एलबीटी बंद केलेली असल्यामूळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती डबघाईस आलेली आहे. प्रभागात कोणत्याही प्रकारची कामे होत नाही स्वेच्छा निधीची कामे होत नाही. उत्पन्न वाढीवर व विकास कामाबाबत चर्चा करण्यात यावी. |
| **विनय गुर्रम** | गाईचा इश्यु महत्वाचा आहे. नागरीकांमध्ये मोठा गैरसमज निर्माण झालेला आहे त्यामूळे त्यावर प्रभम चर्चा करण्यात यावी. |
| **सुदर्शना खोमणे** | शहरातील फक्त गोकुळनगर भागातच गायीचा मृत्यू होत आहे.एकाच भागात गायीचा मृत्यू होत असल्यामूळे नागरीकाचे मनात संशयाचे वातावरण निर्माण होत आहे. त्यामूळे गोकुळनगर भागातच गायीचा मृत्यू का होत आहे पोस्टमॅटचा काय रिपोर्ट आलेला आहे याचा खुलासा करण्यात यावा. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | विरोधी पक्षनेत्याची गाईचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या संदर्भात वृत्तपत्रातही बातम्या प्रसिध्द होत आहे. गोकुळनगर भागातच गाईचा मृत्यू का होत आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे ,खुलासा करण्यात यावा. |
| **उमेश चव्हाण** | शहरातील फक्त गोकुळनगर भागातच मृत्यू होत आहे. याचे कारण विचारले असता शिळे अन्न व प्लॉस्टीकच्या कॅरी बॅग खाल्यामूळे गायीचा मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. ही खुप गंभिर बाब आहे.शिळे व प्लास्टीकचे अन्न खाल्यामूळे इतर प्राण्याचा जसे डुकरे बक-या यांचा मृत्यू झालेला आहे काय याची माहिती देण्यात यावी. मृत गायीचा दाखला असणे आवश्यक आहे,मृत गायीचा दाखला आहे काय ,गायीचा मृत्यू कशामूळे झाला यांचा खुलासा करण्यात यावा. |

**अशोक उमरेकर** गाय हा जीव आहे गायीच्या दाखल्याची आवश्यकता नाही. गोहत्या बदी कायदा लागू झालेला आहे एकाच भागात गायीचा मृत्यू होत असल्यामूळे नागरीकात मोठा संभ्रम निर्माण झालेला असून नागरीकांचा संभ्रम दुर करण्यासाठी गायीचा मृत्यू कशा मूळे होत आहे पोस्टमॅटमचा काय रिपोर्ट आलेला आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** महानगरपालिका अधिनियम कलम ३०९ मध्ये शहरातील मृत जनावराच्या बाबतीत महानगरपालिकेने करावयाची कार्यवाही निश्चित केलेली असून त्यामध्ये १) शहरात मेलेल्या जनावराची प्रेते हलविण्यासाठी तरतूद करणे हे आयुक्तांचे कर्तव्य असेल.२)जनावराच्या मालकाने मेलेल्या जनावराची माहिती तीन तासाचे आंत महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास द्यावयास पाहिजे ३) नगरपालिकेच्या कर्मचा-याने हलविलेल्या प्रत्येक जनावराच्या प्रेताबध्दल जनावराचे प्रेत हलविण्यासाठी आयुक्त ठरविल अशा रक्कमे इतकी फिस जनावराच्या मालकाने दिली पाहिजे किंवा जनावराचे मालक माहित नसेल तर जागेच्या भोगवटादाराने किंवा ज्या व्यक्तीचे ताब्यात जागा आहे त्यांनी व्यक्तीने फिस दिली पाहिजे अशी तरतूद असून त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे.शहरातील नागरीकांच्या जनावराची देखभाल, जतन व संगोपन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची नाही असे मला वाटते. गोकुळनगर भागात ज्या सहा गायीचा मुत्यू झाला त्यापैकी ४ गायीचे शवविच्छेदन करण्यात आले व रोग निदान प्रयोग शाळा यांचा अहवाल प्राप्त झालेला असून या गायीचा मृत्यू तीवृ रुमीनल पेशीमधील आम्ल विषार वाढणे या कारणाने झाल्याचा अहवाल दिलेला आहे.एका गायीच्या मालकांनी शव विच्छेदन करण्यास नकार दिलेला आहे. एक अहवाल अप्राप्त आहे.

**दिपकसिंह रावत** आयुक्तांनी महानगरपालिका अधिनियमातील कलम ३०९ प्रमाणे कार्यवाही केली असल्याचे सांगितले आहे.परंतु शिवाजीनगर भागातील औद्योगिक वसाहतीत कुरकुरे, आलू चिप्स ,बेकरीचे लहान लहान कारखाने असून या कारखान्यातील शिळे, बुरशीयुक्त कुजलेले व नासलेले अन्न रस्त्यावर नालीत टाकण्यात येत असल्यामूळे संबंधित कारखान्या विरुध्द महानगरपालिकेतील स्वच्छता निरिक्षक, क्षेत्रिय अधिकारी, प्रभारी उपआयुक्तांनी काय कार्यवाही केली. त्यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत काय. व्यवसायाकरीता ना हरकत प्रमाणपत्र, बांधकाम परवानगी दिलेली आहे काय, गाईच्या मृत्यूस फक्त संबंधित अधिकारी जबाबदार आहेत सपूर्ण भारतात गोहत्या बंदी कायदा लागू झालेला असुन फक्त गोकुळनगर भागातीलच गाईचा मृत्यू होत असल्याने नागरीकांच्या मनात भितीचे व संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. सध्या शहरातील वातावरण चांगले आहे परंतु गायीच्या मृत्यू मूळे वातावरण खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.अधिकारी कर्मचारी मंगळवारी विविध भागात साफसफाईची मोहिम राबविते,माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, गोकुळनगर भागातही साफसफाईची विशेष मोहिम राबविण्यात यावी. शिवाजीनगर औद्योगिक वसाहतीत जे लघुउद्योजक खाण्याच्या वस्तु कुरकरे, बेकरी, बनवितात त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.सिल करण्यात यावे. त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र रध्द करण्यात यावे. तेथे बांधकाम परवानगी देण्याचे बंद करण्यात यावे.

**रामनारायणजी काबरा** कलम ३०९ प्रमाणे मृत पावलेल्या जनावरांच्या प्रेताची विल्हेवाट लावली असल्याचे आयुक्तानी सांगितले आहे ते ठिक आहे परंतु शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त का होत नाही. ज्या गायी मृत पावत आहे त्याबाबत पोलिसांना कळविले आहे काय संबंधित गायीच्या मालकास कळविण्यात आलेले आहे काय , एकाच भागात गायीचा मृत्यू होत असल्यामूळे नागारीकामध्ये संताप आहे यामूळे शहरातील परिस्थिती बिघडेल याचा विचार करण्यात यावा. एकाच भागात गायीचा मृत्यू का होत आहे याची चौकशी करणे आवश्यक आहे.

**संजय मोरे** गोकुळनगर भागात ज्या गायीचा मृत्यू झाला तो केवळ शिळे अन्न व प्लॉस्टीकच्या कॅरीबॅक खाल्यामूळे झालेला आहे. साफसफाईच्या कामावर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. शहरातील १५-१५ दिवस जमा झालेला कचरा उचलल्या जात नाही.आयुक्त साहेबांना विनंती आहे की,साफसफाईच्या कामावर नियत्रण ठेवून नियमित कचरा उचलण्यात यावा.प्लॉस्टीकच्या कॅरीबॅग वापरावर बंदी असतांनाही दुकानदार प्लॉस्टीकचे कॅरीबॅक मध्ये सामान देत आहे. त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** श्री दिपकसिंह रावत यांनी फक्त गोकुळनगर भागातच गायीचा मृत्यू का होत आहे. असा प्रश्न उपस्थित करुन यामूळे शहरातील वातावरण खराब होण्याची शक्यता वर्तविली आहे. गुरुव्दारा भागात 40-50 गायी राहतात त्यांना काहीही झालेले नाही. श्री दिपकसिंह रावत यांनी सांगितल्या प्रमाणे शिळे व खराब अन्न, प्लॉस्टीकच्या कॅरीबॅग खाल्यामूळे गायीचा मृत्यू झालेला आहे त्यास महानगरपालिकेचे स्वच्छता निरिक्षक, क्षेत्रिय अधिकारी हेच जबाबदार आहे. महानगरपालिका साफसफाईमध्ये कमी पडत आहे. साफसफाई नियमित झाली पाहिजे. व असे प्रकार घडू नये.शहरातील वातावरण खराब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**उमेश चव्हाण** शहरातील साफसफाईचे काम एटूझेड कपनीला देण्यात आलेले असून त्यांचेकडून शहरातील साफसफाई चांगली होत नाही. या सदर्भात वारंवार तक्रार केलेली आहे परंतु कार्यवाही होत नाही. एटूझेड कंपनीकडे

साफसफाईचे कर्मचारी कमी असल्याचे सांगण्यात येते. आंबेडकरनगर, नई आबादी, शिवाजीनगर ,गोकुळनगरातील हमलापुरा या झोपडपटी भागात कच-याचे ढिग जमा झालेले आहे.या भागात विशेष साफसफाईची मोहिम राबवून सर्व कचरा उचलण्यात यावा.शिळे बुरशी युक्तअन्न खाल्यामूळेच गोकुळनगर भागातील गायींचा मृत्यू झालेला आहे. इतर भागात गायीचा मृत्यू झालेला नाही.

**स.शेर अली** देगलूर नाका, खुदवईनगर, गुरुव्दार भागात गायी राहतात त्यांना काहीही झालेले नाही. गोकुळनगर भागातील इडस्ट्रीयल एरियात लहान लहान कारखाने आहेत अक्षय ड्रायक्लीनर्स आहे. या कारखान्यातील निघणारा कचरा, केमिकल खाल्यामूळे गायीचा मृत्यू होत आहे.

**सुंदरलाल गुरुखुदे** जून्या भागातही गायी आहेत त्याना काही झालेले नाही.शिळे अन्न खाल्यामूळे गायी मरत नाही परंतु प्लॉस्टीकच्या कॅरीबॅक खाल्यामूळे गायी मरतात असा अनुभव आहे त्यामूळे प्लॉस्टीवर नियंत्रण ठेवण्यात यावे.गायीचे मृत्यूस कोण कारणीभूत आहे त्याची चौकशीकरुन संबधिता विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**विनय गुर्रम** गोकुळनगर भागात व त्या ठिकाणी भरत असलेल्या आठवाडी बाजारात ५० मायक्रान पेक्षा कमी जाडीच्या प्लॉस्टीकच्या बॅगा नालीत व रस्त्यावर, मोकळया जागेत पडलेल्या दिसून येतात या सर्व प्लॉस्टीकच्या कॅरीबॅग उचलण्यात याव्यात. श्री दिपकसिंह रावत यांनी सांगितल्याप्रमाणे शिवाजीनगर इंडस्ट्रीयल भागातील स्मॉल स्केल इंडस्ट्रीज आहेत या इडस्ट्रीयमध्ये पॅकीगकरीता वापरण्यात येणारे प्लॉस्टीक मोठया प्रमाणात रस्त्यावर व कारखान्यासमोर टाकण्यात येते. हे प्लास्टीक गायी खातात व त्यामूळे गायीचा मृत्यू होत आहे. या कारखानदाराविरुध्द कार्यवाही करण्यात यावी. प्लॉस्टीक कॅरीबॅक ,निघणारा कचरा नियमित उचललला पाहिजे परंतु तो ८-८ दिवस उचलण्यात येत नाही.आयुक्त साहेबाना विनंती आहे की, साफसफाईच्या कामाकडे लक्ष देण्यात यावे. शहरात मोकाट फिरणा-या जनावरावर कार्यवाही करण्याचे व त्यांना कोडवाडयात टाकण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे .शहरातील मोकाट जनावरांना पाबंद करण्यात यावे . स्माल स्केल इडस्ट्रीज विरुध्द काय कार्यवाही करण्यात येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आयुक्त साहेबानी कलम ३०९ नुसार शहरात मृत पावलेल्या जनावराच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याचे सांगितले. नागरीकाची एकच भावना आहे की,शहरातील फक्त गोकूळनगर भागातच गायीचा मृत्यू का होत आहे यामध्ये प्रशासनाची काही चुक आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. शहरात अशा प्रकारच्या घटना असेल तर त्यावर उपाय योजना करण्याची जबाबदारी प्रशासनाची नगरसेवकांची आहे. तसेच जे जनावरे पाळतात त्याची सुध्दा आहे. त्यांनी आपली जनावरे शहरात मोकाट न सोडता घरीच चारापाणी करुन त्याचे जतन व संगोपन केले तर असे प्रकार घडणार नाही. असे प्रकार होत असतील सक्तीने कार्यवाही करण्यात यावी. यापुढे अशा घटना घडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**संजय मोरे** जागो जागी प्लॉस्टीकच्या बॅक ,कचरा-याचे ढिग जमा झालेले आहे ते उचलण्यात येणार आहे किंवा नाही त्याचा खुलासा करण्यात यावा

**प्रमोद खेडकर** श्री अजय बिसेन हे महापौर असतांना त्यांनी शहरातील वेडे व मनोरुग्ण रुग्णासाठी दवाखाना सुरु करण्याचा निर्णय धेतला होता शहरातील मोकाट जनावरे पकडून त्यांना कोंडवाडयात टाकण्यासाठीसाठी बीओटी तत्वावर निविदा काढण्यात यावा व त्यांचे मार्फत शहरातील मोकाट जनावराचां बदोबस्त करण्यात यावा जेणे करुन शहरातील वातावरण खराब होणार नाही.

**डॉ.करुणा जमदाडे** शहरातील मेलेले जनावराची प्रेते उचलून त्याची व्हिलेवाट लावण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याची माहिती देण्यात आली परंतु जनावराचे मालकाची काही जबाबदारी आहे किंवा नाही. ते आपली जनावरे, डूकरे मोकाट सोडून देतात आणि हे जनावरे, डुकरे मुख्य रस्त्यावर येवून मोकाट फिरतात, रस्त्यावर बसतात यामूळे वाहतुकीस अडथळा निर्माण होवून अपघात होत आहे. जनावर मालकाची काही जबाबदारी आहे किंवा नाही जनावराचे मालक आपली जनावरे मोकाट सोडीत असेल तर त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्याची मनपा अधिनियमात काही तरतूद आहे किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**बालाजी कल्याणकर** फक्त गोकुळनगर भागातीलच गायींचा मृत्यू होत आहे हा खुप गंभिर विषय आहे यामूळे शहरातील वातावरण खराब होत आहे.यावर महानगरपालिका काय उपाय योजना करणार आहे, याचा खुलासा करण्यात यावा.शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी कोंडवाडे चालू करण्यात यावे. एटूझेड कंपनी साफसफाईची कामे करीत नसेल तर महानगरपालिकेच्या मजुरांमार्फत करण्यात यावी.

**महापौर** स. सदस्यांच्या भावना लक्षात घेवून आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** देशाचे पंतप्रधानानी स्वच्छता भारत अभियांन सुरु केले असून त्यास देशातील नागरीक मोठया प्रमाणात प्रतिसाद देत आहे. नांदेड वाघाळा शहर महागनरपालिकेमार्फतही अधिकारी व कर्मचा-यांच्या

मार्फत स्वच्छ भारत अभियान राबविण्यात असून दर महिण्याच्या दुस-या व चौथ्या मंगळवारी शहरातील विविध भागात साफसफाईची विशेष मोहिम राबविण्यात येते. शहरात मोठया प्रमाणात ओपन स्पेसेस असून या ओपन स्पेसमध्ये परिसरातील नागरीक कचरा टाकतात व घरातील सांडपाणी सोडतात यामूळे परिसरात अस्वच्छता निर्माण होवून डासाचे प्रमाणे वाढत आहे. या सर्व खाजगी ओपनस्पेस मधील कचरा उचलण्यास महानगरपालिकेतील यंत्रणा कमी पडत आहे. त्यामूळे भारत स्वच्छता अभियान अंतर्गत शहरातील नागरीकांनी आपआपल्या परिसरातील साफसफाईकरीता सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. माझी स.सदस्यांना विनंती आहे की आपल्या प्रभागातील नागरीकांची टिम तयार करुन त्याचे मार्फत आठवडयातून पंधरा दिवसातून एक दिवस प्रभागात साफसफाईची मोहिम राबवावी. या मोहिमेसाठी महानगरपालिकेकडून आवश्यक ते सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल. महाराष्ट्र शासनाने राज्यातील २६ महानगरालिकांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-याची विल्हेवाट लावणेसाठी प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी सक्त आदेश दिलेले आहे. लवकरच घनकचरा व्यवस्थापना सविस्तर प्रकल्प अहवाल सर्व सदस्यांच्या सुचनांचा समावेश करुन तो सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येईल.केंद्र शासनाने प्रतिमानसी रु.२५६ या प्रमाणे १४ व्या वित्त आयोगाचा १५ कोटीचा निधी वितरीत केलेला असून या निधीतून ५० टक्के खर्च हा स्वच्छत भारत अभियानाकरीता खर्च करावा असे केंद्र शासनाचे आदेश आहेत. श्री दिपकसिंह रावत, श्री बालाजी कल्याणकर, श्री गिल, श्री गाडीवाले, श्री गुर्रम श्री शेर अली व इतर स.सदस्यांनी आपल्या तिवृ भावना व्यक्त केलेल्या आहेत.एकाच भागात गाईचा मृत्यू का होत आहेत याची शहानिशा करुन यापुढे अशा धटना घडणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

**विनय गुर्रम** — माझ्या प्रभागात ओपन स्पेस असून या ओपन स्पेस मध्ये मोठया प्रमाणात कचरा व धाण पाणी जमा होत असल्यामूळे या प्लाट मालका विरध्द कार्यवाही करण्यासाठी मी मागील तीन वर्षापासून मागणी करीत आहे परंतु त्यावर कार्यवाही होत नाही.

**आयुक्त** — खाजगी प्लॉट मालकांनी आपल्या मालकीच्या प्लॉटचा वापर कसा करावा हा त्यांचा वैयक्तीक प्रश्न आहे.

**सविता कंठेवाड** — ओपनस्पेस मध्ये घाण पाणी व कचरा जमा होत असल्यामूळे डासाचे प्रमाण वाढून त्या परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. प्लॉट मालक आपल्या जागेचा वापर कचरा टाकण्याकरीता असेल तर महागरपालिकेने त्याचे विरुध्द कार्यवाही करण्याचा शासनाचा जी आर.आहे. त्यामूळे संबंधित प्लॉट मालकांना प्लॉटमध्ये कचरा, पाणी जमा झाल्यास आपणाविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येइल अशा प्रकारच्या नोटीसा देण्यात याव्यात.

**आयुक्त** — कायदेशिर बाबीची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**विनय गुर्रम** — खाजगी प्लॉटवर कार्यवाही करता येत नाही असे सांगण्यात आले परंतु माझ्या प्रभागातील २-३ प्लॉटधारकांनी महानगरपालिकेत आपल्या मालमत्तेची नोंदणी केलेली नाही घर नंबर घेतलेला नाही. प्रभागात दाट लोकवस्ती असून या प्लॉटमध्ये मोठया प्रमाणात कचरा जमा झालेला आहे. घाण पाणी जमा झालले असून घाण पाण्यामूळे डासाचे प्रमाण वाढल्याने मलेरिया डेग्यूची साथ चालू आहे. ही सिरियस बाब आहे संबंधित प्लॉटधारक नागरीकांच्या आरोग्याशी खेळत आहे याबाबत मी वारंवार क्षेत्रिय अधिकारी स्वच्छा निरिक्षक यांचेकडे तीन वर्षापासुन तक्रार करीत आहे परंतु ते कोणतीच कार्यवाही करीत नाही. प्लॉट धारका विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**आयुक्त** — श्री गुर्रम व सौ.कंठेवाड मॅडम यांनी सांगितल्या प्रमाणे कायदेशिर बाबीची तपासणी करुन नियमानुसार प्लाटधारकाना नोटीसा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**संजय मोरे** — एट्झेड कंपनी साफसफाईचे काम करीत नाही, केलेल्या कराराप्रमाणे ते साफसफाईचे कामासाठी मजुर,वाहने देत आहेत काय त्यांच्या कामावर नियंत्रण आहे किंवा नाही. याचा खुलासा करण्यात यावा.

**श्रध्दा चव्हाण** — सभागृहात साफसफाईच्या प्रश्नावर अत्यंत गभिर चर्चा होत आहे. देशाचे पंतप्रधान जाहिरातींव्दारे टिव्हिवर साफसफाईचे महत्व पटवून देत आहेत, त्यामूळे नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने साफसफाईच्या कामाकडे विशेष लक्ष देण्यात यावे. सध्या जलाशयातील पाण्याचा साठा कमी असल्यामूळे नागरीकांना तीन दिवस आड पाणी पुरवठा करण्यात येत असून पाण्याचा वापर जपुन करण्यासाठी नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे. परंतू माझ्या प्रभागातील संजीवनी हॉस्पीटल जवळील पाणी पुरवठा व्हाल्व्ह कित्येक दिवसापासून ना दुरुस्त असल्यामूळे त्याव्दारे हजारो लिटर पाणी वाया जात आहे, त्याठिकाणी दररोज ५०-१०० रिक्षा धुण्यासाठी येतात सदरील व्हाल्वह दुरुस्ती करण्यासाठी लेखी तक्रार करण्यात आली, नागरीकांनी तक्रार केली, वृत्तपत्रातही बातमी प्रसिध्द झाली परंतु आयुक्त साहेब ऐकत नाही आयुक्त साहेब कोणाचे ऐकतात त्या व्यक्तीचे नाव सांगावे आम्ही त्याचे मार्फत आयुक्त साहेबांना सांगू.प्रभागातील विकासाची कामे करण्यासाठी आम्ही मागणी करतो त्यावेळी महानगरपालिकेची

आर्थिक परिस्थिती खराब आहे. निधी नाही असे सांगण्यात येते. परंतु नंदीग्राम मार्केट मध्ये मनपा भाडेकरुन कडून मागील ७-८ महिण्यापासुन भाडे वसुल करण्यात येत नाही. भाडेकरु पैसे देण्यास तयार असतांना त्याचे कडून भाडे घेण्यात येत नाही. जवळपास दरमहा रु.३.०० लक्षाचा किराया महानगरपालिकेस मिळतो. महानगरालिकेचे संबंधित कर्मचारी आम्ही एकदमच ७-८ महिण्याचे भाडे २ टक्के व्याजासह घेवू असे सांगतात, महानगरपालिकेने व्याजाचा धंदा सुरु केलेला आहे काय. भाडेकरु ७-८ महिण्यापासुन भाडे देण्यास तयार असतांना त्याचेकडून भाडे वसुल करण्यात येत नाही. याचा अर्थ महानगरपालिकेकडे भरपुर पैसा आहे म्हणून विशेष बाब म्हणून आयत्यावेळी मी या सर्व भाडेकरुचे ७-८ महिण्ययाचे भाडे माफ करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवित आहे त्यास सभागृहाने मान्यता द्यावी.

**अ.सत्तार** मागील सभेत भाडेवाढ करण्याचे संदर्भात प्रशासनाकडून प्रस्ताव आलेला आहे त्यावर सभागृहात चर्चा झालेली आहे.त्याची अमलबजावणी करण्यात यावी. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे नियमाप्रमाणे भाडेवाढ करण्यात यावी. लवकरात लवकर ठराव करुन देण्यात यावा.

**आयुक्त** प्रशासनामार्फत मागील सभेत महानगरपालिकेच्या भाडेकरुंच्या किरायात वाढ करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता त्यास सभागृहाने मान्यता दिलेली आहे त्यावर अधिनियमातील तरतूदीनूसार पुढील कार्यवाही करण्यात येइल.सर्व महानगपालिका भाडेकरुना अधिनियमातील तरतूदीनूसार भाडेवाढीच्या नोटीसा देण्यात आलेल्या असल्यामूळे जून्या दराने आपणास भाडे घेता येणार नाही. तसेच किराया थकबाकीवर व्याज आकारण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला नाही.शहरातील सर्व पाणी पुरवठा गळत्याचा सर्व्हे करुन गळत्या दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्यात येईल. पाणी पुरवठा लाईन एकतर पाण्याच्या प्रेशर मूळे किंवा नागरीकांकडून पाणी मिळण्यासाठी किंवा गाडया धुण्यासाठी पाईप लाईनला छिद्रे पाडल्यामूळे लिकेजेस होतात. संजीवनी हॉस्पीटल जवळ ५०-१००- रिक्षा धुण्यासाठी येतात असे सांगण्यात आले.रिक्षा धुण्यासाठी जाणून बुजून व्हाल्व्ह खराब केलेला असेल असे वाटते. त्याची दुरुस्ती करण्यात येइल.

**सोनाबाई मोकले** माझा प्रभाग क्र.११ मधील लाईट बंद आहेत ते दुरुस्ती करण्यासाठी वारंवार तक्रार करुनही लाईट चालू करण्यात येत नाही. ते केंव्हा चालू करण्यात येणार आहे. प्रभागातील नागरीकांना पाणी मिळत नाही. कच-याचे ढिग साचलेले ते उचलण्यात येत नाही. नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्यामूळे घाण वास येत आहे. असे खुप गंभिर प्रश्न आहेत ते कधी सोडविणार आहेत.

**डॉ.ललिता बोकारे/शिंदे** जूना मोढा नविन पुलावर मोठ मोठ खडे पडल्यामूळे त्याठिकाणी नेहमी अपघात घडत आहे तसेच पुलाच्या दोन्ही बाजूचे कठडे तुटलेले आहे त्यामूळे नविन पुलाची दुरुस्ती त्वरीत करण्यात यावी. तसेच सिडको हडको भागातील मलनिस्सारण लाईनी खराब झाल्यामूळे रस्त्यावर घाण पाणी वाहत आहे.त्याकडे लक्ष देण्यात यावे.

**आयुक्त** शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने नविन पुलाच्या दुरुस्तीसाठी निधी मंजुर केलेला असून लवकरच त्यांचे मार्फत नविन पुलाचे दुरुस्तीचे व रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे.

**अशोक उमरेकर** आयुक्त साहेबांनी गणपती विसर्जनाचे काळात नविन उपक्रम राबवून खुप चांगले काम केलेले आहे.गोदावरी नदीतील पाणी गणपती मुर्तीला लावण्यात येणारे विषारी केमिकल कलर मूळे प्रदुषीत होवू नये म्हणून शहरातील सर्व गणपतीचे विसर्जन गोदावरी नदीत न करता गोदावरी पात्रात पाण्याचे हौद करुन त्या ठिकणी गणपतीचे विर्सजन करण्यात आले हा उपक्रम राबवित असतांना गणपती मुर्तीची कोणत्याही प्रकारची विटंबना होवू दिली नाही त्याबदल मी त्याचे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे तसेच शिवसेना भाजप युतीचेवतीने त्यांचा सत्कार करीत आहोत.

**बाळासाहेब तरोडेकर** श्री अशोक उमरेकर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** शहरातील गणपती विसर्जनाच्या संदर्भात महानगरपालिकेतील नगरसेवकांनी गेस्ट हावसू येथे मिटिंग घेतली त्यावेळी विरोधी पक्षाचे नगरसेवक मिटिगला उपस्थित नव्हते.

**अशोक उमरेकर** आयुक्त साहेबांनी चांगले काम केल्याबदल त्याचा सत्कार आम्ही करीत आहोत.
(शिवसेना भाजप यूतीचे वतीने आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यांचा सत्कार करण्यात आला)

**महापौर** श्री अशोक उमरेकर यांनी मांडलेला प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.५८** **ठराव**

आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यांनी गोदावरी व आसना नदीतील पाणी प्रदुषीत होवू नये म्हणून नदीपात्रात हौद तयार करुन अत्यंत चांगल्या पध्दतीने नियोजन करुन गणपती मुर्तीची विटंबना होवू न देता गणपतीचे विसर्जन केले त्याबदल त्यांचे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा हार्दीक अभिनंदन करते.

**फारुख हुसेन कासिम साब** श्री शफि अहेमद कुरेशी यांचे प्रभागात इतवारा बकरा मार्केटचे बांधकाम पुर्ण होवून २-३ वर्ष झाले परंतु आज पर्यत त्यातील गाळे भाडेपटीवर देण्यात आलेले नाही यामूळे महानगरपालिकेचे दरवर्षाला १८ लक्षाचे नुकसान होत आहे यास कोण जबाबार आहे

**अ.सत्तार** बकरा मार्केटचे बांधकाम होवून दोन वर्ष झाले अजूनही ते भाडेपटीवर देण्यात आलेले नाही यामूळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. या गाळयावर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. लवकरात लवकर ते भाडेपटीवर देण्यात यावे.

**उमेश चव्हाण** दोन वर्षापासुन मार्केटचे बांधकाम होवूनही ते अद्याप भाडेपटीवर का देण्यात आलेले नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**विनय गुर्रम** शहरातील साफसफाईचे कामाचे कंत्राट एटूझेडला देण्यात आलेले असून या कंत्राटदाराने आज पर्यत किती कचरा उचलला, त्यांना किती देयकांची अदाई करण्यात आली, किती दंड आकारण्यात आला यासंबंधीची सविस्तर माहिती मी दोन वर्षापासून मागत आहे परंतु आज पर्यत मला माहिती देण्यात आलेली नाही. माहिती देण्यास काय अडचण आहे. वर्ष वर्ष माहिती का देण्यात येत नाही. याचेमध्ये कोणाचा हात आहे. पैसे घेवून कोण दबलेले आहे.

**महापौर** स.सदस्यांनी विना पुरावा कोणावरही असे आरोप करु नये. पुरावा असेल तर तो देण्यात यावा. आयुक्त त्याची चौकशी करतील.

**आयुक्त** महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून काबरानगर,बंजारा हॉस्टेल,साईट क्र.३४ अशा विविध ठिकाणी व्यापारी संकुंलाचे बांधकाम हाती घेतलेले असून बांधकाम पुर्ण झाल्यानंतर या सर्व व्यापारी संकुलातील गाळे व इतर व्यापारी संकुलातील रिकाम्या गाळयांची माहिती घेवून ते नियमानुसार लिलावाव्दारे भाडेपटीवर देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**बाळासाहेब देशमूख** आमच्या प्रभागात पाणी सोडण्याची वेळ सकाळी ६.०० वा.ठेवण्यात आलेली आहे परंतु यादरम्यान लोडशेडीग असल्यामूळे नागरीकांना पाणी मिळत नाही.माझी विनंती आहे की पाणी सोडण्याची वेळ सकाळी ६.०० ऐवजी सकाळी ५.०० वा.करण्यात यावी.

**रजिया बेगम** श्री बाळासाहेब देशमूख यांनी जी मागणी केली ती बरोबर आहे.आमच्या भागात पाणी सोडण्याची वेळ सकाळी ६.०० ऐवजी ५.०० वा करण्यात यावी.

**आनंद चव्हाण** रिलायन्स ४ जी प्रकरणात महासभेने माझ्या अध्यक्षतेखाली स.सदस्यांची एक उपसमिती कायम केली होती त्यानुसार या उपसमितीने चौकशी पुर्ण केली असून उपसमितीचा चौकशी अहवाल मा.महापौर यांना सादर करण्यात येत आहे त्यांनी तो सभागृहा समोर ठेवावा.

**विनय गुर्रम** रिलायन्स ४ जी ची माहिती देण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** हा अहवाल बहुमताने दिलेला आहे काय , कारण या उपसमितीच्या दोन सदस्यांनी राजीनामा दिलेला आहे.

**महापौर** उपसमितीचा चौकशी अहवाल पुढील सभेत ठेवण्यात येइल त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जूलै | ११२३ | ९४७ | १५५८५ | ९१३.२० |

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** मागील वर्षी याच महिण्यात मुला मुलीचे गुणोत्तर काय होते त्यात वाढ किंवा घट झाली याची सविस्तर माहिती देत जावी.

**आयुक्त** आपल्या सुचनेची दखल घेवून यापुढे मागील वर्षाचे मुला मुलीचे गुणोत्तराचा तक्ता देण्यात येईल.

**महापौर** नोदं घेण्यात येते.

**ठराव क्र.५९** **ठराव**

**खालील प्रमाणे देण्यात आलेल्या** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जूलै | ११२३ | ९४७ | १५५८५ | ९१३.२० |

**विषय क्र.२**

शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी एक कार्यालयाच्या इमारतीमध्ये उर्जा संवर्धन तत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी महाऊर्जा कडुन रु.२५.०० लाख पर्यत अर्थसहाय्य उपलब्ण्ध्द होणार आहे. सदर पथदर्शी प्रकल्पा अतर्गत इमारतीतील वापरात असलेली जून्या तंत्रज्ञानाची उपकरणे/यंत्रणा काढून नविन तंत्रज्ञानावर आधारीत उपकरणे बसविणे,उर्जा बचतीसाठी अपारंपारीक उर्जा स्त्रोत्रांताचा किफायतशीर वापर करणे. इमारतीमध्ये उर्जा वापर मोजमाप व मॉनिटरिंग करणारी यंत्रणा बसविणे इत्यादीचा समावेश आहे.

नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या स्टेडियम इमारतीतील विद्युत व्यवस्था अत्यंत जुनी असल्यानेसदर प्रकल्प स्टेडियम इमारतीमध्ये राबविण्यासाठी मान्यता देणेस्तव व सदर प्रकल्प हाती घेण्याकरीता महाउर्जा कडील नोंदणीकृत संस्थेकडून संपूर्ण प्रगल्प अहवाल तयार करणे व एनर्जी ऑडीट करुन घेण्यासाठी मान्यतेस्तव व सदरील योजने अंतर्गत नावामनपाकेचा समावेश करण्यासाठी महाउर्जाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देणे बाबत.

**महापौर** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.६०** **ठराव**

शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी एक कार्यालयाच्या इमारतीमध्ये उर्जा संवर्धन तत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी महाऊर्जा कडुन रु.२५.०० लाख पर्यत अर्थसहाय्य उपलब्ण्ध्द होणार आहे. सदर पथदर्शी प्रकल्पा अतर्गत इमारतीतील वापरात असलेली जून्या तंत्रज्ञानाची उपकरणे/यंत्रणा काढून नविन तंत्रज्ञानावर आधारीत उपकरणे बसविणे,उर्जा बचतीसाठी अपारंपारीक उर्जा स्त्रोत्रांताचा किफायतशीर वापर करणे. इमारतीमध्ये उर्जा वापर मोजमाप व मॉनिटरिंग करणारी यंत्रणा बसविणे इत्यादीचा समावेश आहे.

करीता आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या स्टेडियम इमारतीतील विद्युत व्यवस्था अत्यंत जुनी असल्याने सदर प्रकल्प स्टेडियम इमारतीमध्ये राबविण्यासाठी मान्यता देण्यात येते तसेच सदर प्रकल्प हाती घेण्याकरीता महाउर्जा कडील नोंदणीकृत संस्थेकडून संपूर्ण प्रकल्प अहवाल तयार करणे व एनर्जी ऑडीट करुन घेण्यासाठी तसेच सदरील योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा समावेश करण्यासाठी महाउर्जाकडे प्रस्ताव सादर करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत काम करण्यात येतो.

**विषय क्र .३**

श्री. किशन जेठबा हाळदे व इतर यांनी दि. 22.04.2010 च्या अर्जामध्ये स.नं.59-बी मौ. वजिराबाद या जमिनीवरील आरक्षणा रद्द करण्याबाबत विनंती केलेली आहे.

तसेच, अर्जदार यांनी यापूर्वी नांदेड शहराच्या मंजूर सुधारित विकास योजने मधील मौजा वजिराबाद येथील स.नं.59 मधील आरक्षण क्र.1-ए 'खेळाचे मैदान', 60.00 मी.विकास योजना रस्ता व 15.00 मी. विकास योजना रस्ता ने बाधित होणा-या जागेबाबत दि.(15/11/2008) ची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 49 अवये शासनास खरेदी सूचना बजावलेली आहे.त्यानुसार शासनाने दि.20.04.2009 च्या पत्रावये सदरची खरेदी सूचना अमान्य केलेली आहे.

अर्जदार यांनी संदर्भ क्रं.(2) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची नोटीस सादर केली आहे.संदर्भ क्रं.(5) अन्वये सादर केलेल्या अर्जा सोबत मोजणी नकाशानूसार एकूण जागेबाबत बोध होत नसल्यामुळे संदर्भ (6) अन्वये अर्जदाराने दिलेली नोटीस फेटाळण्यात आली आहे.

नांदेड शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये सेक्टर A मध्ये मौ. वजिराबाद मधील स.नं.59 वर आरक्षण क्र. 1-ए 'खेळाचे मैदान ' (क्षेत्र 5.0 हेक्टर), 60.00 मी. विकास योजना रस्ता व 15.00 मी. विकास योजना रस्ता व उर्वरित भाग रहिवास वापरासाठी दर्शविण्यात आलेले आहे.

तरी, अर्जदार यांचे दि. 05.03.2014 ची खरेदी सुचना तसेच यापूर्वी मनपास सदर आरक्षणाखालील जागा संपादन करणे कामी तगादा असल्यामुळे तसेच विकास योजना मंजूर होवून दहा वर्षे उलटून गेल्याने आता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची नोटीस लागू होत असल्यामुळे उपरोक्त स.नं.59 वरील आरक्षण क्र. 1-ए 'खेळाचे मैदान' चे भुसंपादन करणे आवश्यक असून सदरची जागा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,1966 चे कलम 126 (4) सह भूसंपादन कायदया चे तरतूदीनुसार संपादन करणे आवश्यक आहे तसे न झाल्यास सदर चे आरक्षण व्यपगत होते.

अर्जदार यांनी दि.19.8.2014 रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची खरेदी सुचना बजावलेली आहे.सदर खरेदी सुचनेच्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे दि.26.12.2014 रोजी पाठविण्यात आला आहे.शासनाचे परिपत्रक टिपीएस-2013/प्र.क्रं.547/2013/नवि 30,दि.12.2.2014 नुसार खरेदी सुचना प्राप्त झाल्यापासुन 1 वर्षाच्या कालावधीमध्ये आरक्षणाखालिल जागेच्या भुसंपादनाबाबत कलम 126(2) किंवा (4) अन्वये राजपत्रात प्रसिध्दी करण झाले नसल्यास सदरचे आरक्षण व्यपगत होते.त्यामुळे ज्या उद्देशांसाठी विकास योजना केली जाते तो उद्देश सफल होत नाही व सर्वसामान्य जनतेस आवश्यक सार्वजनिक सोयी सुविधापासून वंचित रहावे लागते.

तरी,प्रस्तुत प्रकरणातील विकास योजनेतील आरक्षण व्यपगत होऊ नये म्हणून सदर जमिन भुसंपादन करण्यास व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी वरील प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** अशा प्रकारचे किती विषय आहे याची माहिती देण्यात यावी.

**आयुक्त** श्री. किशन जेठबा हाळदे व इतर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची नोटीस देवून आरक्षणातील जागा संपादित करण्यात यावी किंवा जागेचे आरक्षण रध्द करण्यात यावे अशी मागणी केलेली असून त्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव दिलेला आहे.

**उमेश चव्हाण** सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता एवढा मावेजा महानगरपालिका देवू शकते काय.शासनाकडून निधी मागविण्यात यावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आरक्षणाची जागा संपादित करण्यासाठी शासनाकडून निधी मागविण्यात यावा.

**स.शेर अली** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. सध्या टोकन अमावुन्ट ठेवण्यात यावी. निधी उपल्बध्द करुन देण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

**महापौर** आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येवून सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामूळे विशेष बाब म्हणून शासनास भुसंपादनाकरीता विशेष अनुदान देण्यासाठी विनंती करण्यात यावी .व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.६१** **ठराव**

नांदेड शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये सेक्टर A मध्ये मौ. वजिराबाद मधील स.नं.59 मधील जमिनीवर आरक्षण क्र. 1-ए 'खेळाचे मैदान ' (क्षेत्र 5.0 हेक्टर), 60.00 मी. विकास योजना रस्ता व 15.00 मी. विकास योजना रस्ता व उर्वरित भाग रहिवास याकारणासाठी आरक्षित करण्यात आलेले असून या जागेचे मालक श्री. किशन जेठबा हाळदे व इतर यांनी दि. 22.04.2010 च्या अर्जामध्ये स.नं.59-बी मौ. वजिराबाद या जमिनीवरील आरक्षणा रद्द करण्याबाबत विनंती करुन दि. 05.03.2014 ची खरेदी सुचना तसेच यापूर्वी मनपास सदर आरक्षणाखालील जागा संपादन करणे कामी तगादा असल्यामुळे तसेच विकास योजना मंजूर होवून दहा वर्षे उलटून गेल्याने आता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची नोटीस लागू होत असल्यामुळे उपरोक्त स.नं.59 वरील आरक्षण क्र. 1-ए 'खेळाचे मैदान' चे भुसंपादन करणे आवश्यक असून सदरची जागा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,1966 चे कलम 126 (4) सह भूसंपादन कायदया चे तरतूदीनुसार संपादन करणे आवश्यक आहे तसे न झाल्यास सदर चे आरक्षण व्यपगत होते.त्यामुळे ज्या उद्देशांसाठी विकास योजना केली जाते तो उद्देश सफल होत नाही व सर्वसामान्य जनतेस आवश्यक सार्वजनिक सोयी सुविधापासून वंचित रहावे लागते.

करीता,प्रस्तुत प्रकरणातील विकास योजनेतील आरक्षण व्यपगत होऊ नये म्हणून सदर जमिन भुसंपादन करण्यास व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभा सर्वानुमते देते.सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामूळे शासनास सदर आरक्षणातील जागा भुसंपादनासाठी विशेष अनुदान देण्यासाठी विनंती करण्यात यावी, असेही ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभा सर्वानुमते संमत करते . व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.४**

**विषय:-** गुरु-त्ता-गद्दी सोहळा 2008 व नांदेड शहर विकास योजना सुधारीत अंतर्गत पश्चिम वळण रस्ता गोदावरी नदी पासुन लातुर रोड 60 मि.रुंद रस्ता भाग-6 मावेजासाठी निधी जमा करणे बाबत.

**संदर्भ** :- उपजिल्हाधिकारी भुसंपादन पात लसिका क्रं-2 नांदेड यांचे पत्र क्रं.2013/भुसं/लसिका-2 दि.30.11.2013

गुरु-त्ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळा 2008 व नांदेड शहर विकास योजना सुधारीत अंतर्गत नांदेड शहराचे विविध भागात रस्त्याचे विकास करणेसाठी खाजगी जागा संपादीत करण्याकरीता प्रस्तावीत प्रमाणे सन-2007-08 मध्ये शासनाकडुन निधी प्राप्त झाला त्याप्रमाणे विषयांकित पश्चिम वळण 60 मि.रुंद रस्ता क्रं.-38अ भाग-6साठी पुढील तपशिल प्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.

| अ.क्र. | प्रशासकिय मान्यता प्रमाणे प्राप्त निधी | भुसंपादन विभागाकडे 2/3 पोटी अग्रीम जमा केलेली रक्कम | मनपा फंडात जमा असलेली रक्कम | निवाडयानुसार देय होणारी रक्कम | जमा केलेली अग्रीम रक्कम वगळुन देय होणारी रक्कम | प्र.मा.पेक्षा अधिकची लागणारी रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | 64.30 लक्ष | 43.00 लक्ष | 21.30 लक्ष | 34251814 | 29988774 | 27821814 | |

या प्रकरणा बाबत थोडक्यात तपशिल असा आहे. गुरु-त्ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळा 2008 चे अनुषंगाने तातडीने सोहळा साजरा होणेपुर्वी रस्ता करणे अत्यावश्यक होते करिता भुधारकांचे सम्मतीने संपादीत क्षेत्र मनपा तर्फे ताबेत घेऊन रस्त्याचा विकास करण्यात आला आहे व मुळ प्रस्ताव पत्र क्रं.विकाअ/भुसंपादन/मनपा/362/07 दि.24.08.07 अन्वये मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्ताव विशेष भुसंपादन अधिकारी पात लसिका क्रं-2 नांदेड यांचेकडे भुसंपादन कार्यवाहीसाठी दि.11.09.2007. रोजी वर्ग करण्यात आले आहे.

त्यानंतर मा.जिल्हाधिकारी नांदेड यांनी या विभागा कडील कामाचा व्याप पाहाता सदर प्रस्ताव विशेष भुसंपादन अधिकारी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग -1 यांचेकडे वर्ग केले प्रमाणे त्याच्याकडुन कलम 4 (1) ची अधिसुचना प्रसिध्द करण्यात आले नंतर विशेष भुसंपादन अधिकारी इवद नांदेड यांच्याकडे दि.04.06.2009 रोजी वर्ग केले परंतू त्याचेकडे कामाचा व्याप अधिक असल्याने सदर प्रकरण विशेष भुसंपादन अधिकारी कृष्णा खोरे नांदेड यांच्याकडे दि.05.08.2009 रोजी वर्ग केले प्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

शासनाच्या आदेशाप्रमाणे दि.13.08.2013 पासुन उपजिल्हाधिकारी भुसंपादन कृष्णा खोरे हे निरस्त झाल्यामुळे सदर प्रकरण उपजिल्हाधिकारी भुसंपादन पात लसिका क्रं.-2 नांदेड यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

दि.01.01.2014 पासुन केंद्र शासनाने अस्तीत्वातील पुर्वीचे भुसंपादन अधिनियम 1894 संपुष्टात आणले असुन नविन कायदा लागु केला आहे करीता नवीन कायदा आमलात येण्या तत्पुर्वी निवाडा अंतीम करणेच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग निर्णय क्रं. एल.क्यु.एन. 18/2002/प्र.क्र.53/अ-2 दि.17/01/2008 मधिल निर्देशा नुसार निधीची पुर्तता झाले नंतर निवाडा घोषीत करणे असल्याने भुसंपादन मावेजा पोटी अधिकची लागणारी अंदाजे रुपये 319,56,594/- ची मागणी केली होती. त्यामध्ये सोयी सुविधा 7% ची रक्कम आकारण्यात आली आहे परंतु 7% रक्कम ऐजवी या कार्यालयाकडुन कंप्युटर, लॅपटॉप व संगणक चालक दिले असल्यामुळे वेगळ्याने सोयी सुविधाची रक्कम देण्यात आली नाही. करिता रुपये 2327793/- वगळुन उर्वरीत रक्कम 29628801/- देय आहे.

गुरु-त्ता-गद्दी सोहळा 2008 अनुषंगाने प्राप्त निधी पेक्षा अधिकचा लागणारा निधी महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्रं. गु.ग्र.सा. 2007/प्र.क्र.-35/का-1473 दि.27/07/2007 मधिल निर्देशा नुसार मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्रं. 2007/नियोजन/गुग्रसा दि.15/04/2008 मधिल अट क्रं. 5 मध्ये नमुद केले प्रमाणे शासना कडुन प्राप्त होणार नसुन प्रशासकीय मान्यते पेक्षा अधिकची उर्वरीत रक्कम मनपाच्या फंडातुन खर्च करणे आहे. तथापी उपजिल्हाधिकारी भुसंपादन कृष्णा खोरे याचेकडे वेगवेगळया प्रकरणात अग्रीम रक्कम जमा केलेल्या रक्कमेपेक्षा निवाडयाची रक्कम कमी देय झाल्यामुळे त्याच्याकडील शिल्लक असलेली रक्कम कमी करुन या प्रकरणात रक्कम रुपये 22101661/- मावेजा पोटी मनपा फंडातुन देणेकरीता दि. 07.11.2013 रोजी देयक लेखा विभागाकडे दाखल केले आहे. परंतु मनपा फंडामध्ये भुसंपादनासाठी वेगळ्याने पुरेशी आर्थीक तरतुद केलेली नाही त्यामुळे अद्यापही मावेजाची रक्कम जमा करता आली नाही.

वास्तविक गुरु-त्ता-गद्दी सोहळा 2008 चे अनुषंगाने सदर रस्ता भुधारकाचे मौखीक संम्मतीने पुर्ण करण्यात आला असुन एकुण या रस्त्याचे 6 भाग मध्ये भुसंपादनाची कार्यवाही करण्यात आली त्यापैकी 1 ते 5 भागातील भुसंपादनाचा मावेजा वितरण केला आहे. केवळ याच भागातील भुधारकांना मावेजा वितरण करणे शिल्लक आहे. या रस्त्यासाठी प्रशासकीय मान्यते प्रमाणे प्राप्त निधी रु.64.30 लक्ष पैकी रुपये 21.30 लक्ष मनपा फंडामध्ये जमा असुन केवळ रक्कम रु.19971661/- मनपा फंडातुन देय आहे या बाबत वारंवार महावारी भुसंपादन कामाचे आढावा बैठकीत मा.जिल्हाधिकारी यांचेकडुन मावेजा वाटपा साठी निधी जमा करणेसाठी सुचना दिली असुन विलंबामुळे व्याजाच्या रक्कमेचा अधिक भार मनपावर येत आहे. म्हणुन सदर रक्कम मनपा फंडातुन वितरण करणे आवश्यक आहे.

तेव्हा सन 2015-16 चे अंदाज पत्रकात या रस्त्याचे भुसंपादनासाठी मनपा फंडातुन देय रक्कम रुपये 22101661/-जमा करणे साठी मान्यता देण्यास्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**स.शेर अली** — मावेजा देणेसाठी शासनाकडून निधी मागविण्यात यावा.

**आयुक्त** — महाराष्ट्र शासन नियोजन विभाग निर्णय क्र.गु.ग्रं.सा-२००७/प्र.क्र.३५/का/१४७३ दि.२७.७.२००७ मधील निर्देशानूसार प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिकची रक्कम मनपाने खर्च करण्याचे निर्देष असल्यामूळे शासनाकडून निधी मिळणार नाही.कारण शासनाने या अगोदरच निधी दिलेला आहे.

**उमेश चव्हाण** — महानगरपालिकेची बाजू पाहणार आहे किंवा नाही मावेजा देण्याकरीता महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली आहे का शासनास अनुदानाचा प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**विनय पाटील** — आसदवन भागातील नागरीकांनी सालसन २००८ मध्ये गुरु ता गध्दी अतर्गत रस्त्याकरीता कोणत्याही प्रकारचा अडथळा आणता स्वखुषीने आपल्या जमिनी तात्काळ महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्या परंतु आज पर्यत या जमिनीची मोजणी करण्यात आलेले नाही. त्याना कोणत्याही प्रकारचा मावेजा देण्यात आलेला नाही.माझी विनंती आहे की त्यांनाही जमिनीचा मावेजा देण्यासाठी मान्यता देण्यात यावी नसता ते केंव्हा ही रस्ते बंद करु शकतात.

**अशोक उमरेकर** — शासनाकडून निधी मागवावयाचा नाही तर मग महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असतांना महानगरपलिका २.३० कोटीचा निधी देवू शकते काय याचा खुलासा करण्यात यावा.

**महापौर** — आयुक्तांनी आपला खुलासा केलेला आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीनुसार मावेजा देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ६२** **ठराव**

गुरु-त्ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळा 2008 चे अनुषंगाने प्राप्त निधीचे लेखे दि.३१.३.२००९ रोजी संपुष्ठात आले आहेत सदरचा निवाडा दि. ३०.११.२०१३ रोजी अंतिम करण्यात आला असून रक्कम रु.३१९५६५९४ ची मागणी करण्यात आली आहे.या रस्त्याच्या भागासाठी प्रशासकीय मान्यते प्रमाणे रु.६४.४० लक्ष निधी प्राप्त झाला असून त्यापेक्षा रु.२,७८,२१,८१४/- अधिक आहे. ही रक्मकम शासनाकडून प्राप्त होणार नाही. त्याकरीता महानगरपालिका फंडातून देणे आहे. गुरु-त्ता-गद्दी अंतर्गत प्राप्त निधी पैकी संबंधित भुसंपादन

अधिका-याकडील शिल्लक निधी वगळून रु.२,२१,०१,६६१.०० नांवामनपा सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकात या रस्त्याचे भूसंपादनासाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता सदरील जागेच्या भुसंपादनाची अदाई महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनूसार देण्यात यावी असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.५**

चौदाव्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून मार्गदर्शक तत्वानुसार घन कच-याचे संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया यासाठी खालील प्रमाणे मशिनरीज खरेदी करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे रक्कम रु. दोन कोटी चोविस लक्ष पन्नास हजार फक्तला प्रशासकीय आर्थिक मान्यता व्हावी तसेच वरील प्रमाणे वाहने व मशिनरीज खरेदी पश्चात त्यांचा विमा काढणे,पासिंग करणे,किरकोळ एक्सेसरीज बसविण्यासाठी लागणा-या खर्चास देखील प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यास मान्यता व्हावी.

| अ.क्र. | प्रकार | संख्या | अंदाजे दर रु. | अंदाजे किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| १ | डिसील्टींग मशीन | 03 | 10,00,000/- | 30,00,000/- |
| २ | नाला मॅन मशिन | 02 | 6,50,000/- | 13,00,000/- |
| ३ | नाला मॅन मशिनसाठी | 03 | 6,50,000/- | 19,50,000/- |
| ४ | JCB 2 DX Machine | 02 | 22,50,000/- | 45,00,000/- |
| ५ | JCB 3 DX Machine | 01 | 29,00,000/- | 29,00,000/- |
| ६ | Tractor Trolley | 04 | 8,50,000/- | 34,00,000/- |
| ७ | Innova Car मा.महापौर व आयुक्ताचे तपासणी पथकासाठी | 02 | 16,00,000/- | 32,00,000/- |
| ८ | Tata Sumo Gold Jeep नियंत्रणाकरीता | 04 | 5,50,000/- | 22,00,000/- |
| | एकूण रुपये | | | 2,24,50,000/- |

वरील प्रमाणे वाहने व मशिनरीज खरेदी नंतर आवश्यकतेनुसार वाहन चालकांची कंत्राटी पध्दतीने भरती कराण्यास देखील मान्यता व्हावी सदरचा ठराव याच सभेत कायम करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**दिपकसिंह रावत** — १४ व्या वित्त आयोगाचे निधीतून कोणकोणत्या कामासाठी खर्च करावा याबाबत सालसन २०१५ मध्ये शासनाने परिपत्रक आलेले आहे. या शासन परिपत्रकात ५० निधी हा घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी व शौचालयाचे बांधकामासाठी खर्च करावा असे नमूद आहे.तसेच कलम ६३ मध्ये ही शासन निधीतून शासनाने सुचविलेल्या बाबीकरीता खर्च करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. मशिनरीज व वाहने खरेदी करण्यासाठी निधी खर्च करणे बाबत शासनाचे निर्देष नाहीत त्यामूळे या प्रस्तावास आमचा विरोध आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवून मशिनरीज व वाहने खरेदी करण्यात यावीत. जून्या नांदेड शहराकरीता अग्नीशमन केद्र सुरु करण्यासाठी आम्ही अनेक दिवसापासून मागणी करीत आहोत परंतु निधीअभावी हे काम प्रलंबित आहे १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जून्या नांदेड शहरात अग्नीशमन केंद्र सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात यावी. निधीअभावी जी विकास कामे अपुर्ण आहेत प्रलंबित आहेत अशा कामाना १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून मान्यता देण्यात यावी. मशिनरीज व वाहने १४ व्या वित्तआयोगाच्या निधीतून खरेदी करण्यास शिवसेना पक्षाचा विरोध राहील.

**विनय गुर्रम** — आमचा विरोध लिहिण्यात यावा.

**विरेद्रसिंघ गाडीवाले** — संबंधित अधिकारी व कर्मचा-यांशी चर्चा केली असून त्याप्रमाणे माझ्यातर्फे सुचवितातो की. डिसिल्टींग मशिन व नाला मॅन मशिन यांची कार्यक्षमता योग्य नसल्यामूळे त्या खरेदी करण्यात येवू नये तथापी यापूर्वी दोन नाला मॅन मशिन खरेदी केलेल्या असल्यामूळे व एक नाला मॅन मशिनला ट्रक्टर हेड नसल्यामूळे एक ट्रक्टर हेड नव्याने खरेदी करण्यात यावे तसेच मलनिस्सारण वाहिण्या सुरळीत चालू राहण्याकरीता जेटींग मशिनची आवश्यता असल्यामूळे दोन जेटींग मशिन ९ हजार लिटर क्षमतेच्या खरेदी करण्यात याव्यात

| | |
|---|---|
| **प्र.उपअभियंता यांत्रिकी** | प्रशासनाने आजच्या बाजार भावाच्या किंमती विचारात घेवून रु. 2,24,50,000/-चा प्रस्ताव दिला होता परंतु स.सदस्यानी वाहनांची व मशिनरीजच्या संख्येत बदल केलेला असल्यामूळे व मशिनरीजच्या वाहनाच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता असल्यामूळे खर्च वाढण्याची शक्यता आहे त्यामूळे रु.३,१५,००,०००/-ला प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी. |
| **स.शेर अली** | जून्या नांदेड शहरात लहान लहान गल्या असून रस्ते अरुंद असल्यामूळे त्या भागात आग लागली तर मोठी अग्नीशनम वाहन जात नाही म्हणून जून्या नांदेड शहराकरीता लहान अग्नीशमन वाहने खरेदी करुन त्या भागाकरीता अग्नीशमन केंद्र सुरु करण्यासाठी त्या भागातील नगरसेवक अनेक दिवसापासून मागणी करीत आहे. माजी आयुक्त श्री जी श्रीकांत यांनी अग्नीशमन केद्र सुरु करण्याचे आश्वासनही दिले होते. तरी जून्या नांदेड भागाकरीता अग्नीशमन केंद्र सुरु करण्यासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून मान्यता देण्यात यावी. व हे अग्नीशमन केंद्र लवकरात लवकर सुरु करण्यात यावे. |
| **फारुख अली खाँ** | साफसफाईच्या कामासाठी विविध मशिनरीज व वाहने खरेदी करण्याचा जो प्रस्ताव प्रशासनाने दिला आहे तो अंत्यत चांगला आहे.त्यामूळे शहरातील विविध भागातील लहान लहान गल्लीतील साफसफाईचे कामे लवकर होतील.नियमित कचरा उचललला जाईल. प्रत्येक सभेत नगरसेवक एटूझेड कपंनी मार्फत शहरातील साफसफाई कामे होत नाही कच-याचे ढिग उचलण्यात येत नाही अशी तक्रार करीत आहेत.मशिनरीज वाहने धेतली तर शहरातील साफसफाईची कामे लवकर होतील आणि नागरीकाचे आरोग्य चागले राहील.त्यामूळे आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| **अ.सत्तार** | श्री विरेद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. |
| **महापौर** | श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले व उपअभियंता यांत्रिकी यांनी मांडलेल्या प्रस्तावाप्रमाणे प्रस्तावात दुरुस्ती करुन मान्यता देण्यात येत व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. |

**ठराव क्र. ६३** **ठराव**

चौदाव्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून मार्गदर्शक तत्वानुसार घन कच-याचे संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया यासाठी खालील प्रमाणे मशिनरीज/वाहने खरेदी करणे आवश्यक असल्याने सदरील मशिनरीज व वाहने ही चौदाव्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून खरेदी करण्यासाठी लागणारा एकूण खर्च रक्कम रु. ३,१५,००,००० (अक्षरी रु.तीन कोटी पंधरालक्ष फक्त) ला तसेच सदरील प्रमाणे वाहने व मशिनरीज खरेदी पश्चात त्यांचा विमा काढणे, पासिंग करणे, किरकोळ एक्सेसरीज बसविण्यासाठी लागणा-या खर्चास आणि ऐनवेळी जर वाहने/मशिनरीजच्या किमतीत वाढ झाल्यास त्यावाढीव किंमतीस देखील प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

| अ.क्र. | मशिनरजीज/ वाहनाचे प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १ | नाला मॅन मशिनसाठी ट्रॅक्टर | 01 |
| २ | JCB 2 DX Machine | 02 |
| ३ | JCB 3 DX Machine | 01 |
| ४ | Tractor Trolley | 04 |
| ५ | Jeep पथक नियंत्रणाकरीता | 06 |
| ६ | हायप्रेशर जेटींग मशीन(9000 ली.क्षमता) | 02 |
| ७ | वरील प्रमाणे जेटींग मशीन करीता हाय प्रेशर जेटींग होस १ इंची | 240 मीटर |
| ८ | जेटींग मशीन क्रं MH-26-H-7253 करीता हाय प्रेशर जेटींग होस ¾ इंची | 120 मीटर |
| ९ | जेटींग कम सक्शन मशीन क्रं MH-26-D-1361 करीता हाय प्रेशर जेटींग होस ¾ इंची | 120 मीटर |
| १० | कंत्राटदारा कडुन प्राप्त होणा-या जेटींग कम सक्शन मशीण करीता हाय प्रेशर जेटींग होस ¾ इंची | 120 मीटर |

तसेच वरील प्रमाणे वाहने व मशिनरीज खरेदी नंतर आवश्यकतेनुसार वाहन चालकांची कंत्राटी पध्दतीने भरती करण्यास व त्यावर लागणा-या खर्चास देखील प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६**

केंद्र शासन व राज्य शासन यांचे वतीने महानगरपालिकेच्या विविध योजनेंच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येत असलेल्या बैठकीस दिल्ली, मुंबई येथे उपस्थित राहण्यासाठी महापौर, आयुक्त यांना निमंत्रीत करण्यात येते. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेचे प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाची मान्यता मिळविणेसाठी प्राप्त प्रस्तावाची माहिती पुरविणे, बैठकीस उपस्थित राहणे, दिलेल्या सुचनेनुसार माहिती सादर करणे ई.कामासाठी महापौर, आयुक्त यांना मुंबई व दिल्ली येथे जावे लागते, तसेच देशातील विविध महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती घेण्यासाठी वारंवार जावे लागते त्यामूळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) फ नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ठराव क्रं. १५९ दिनांक २०.०२.२००७ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व सभापती महिला बाल कल्याण समिती यांना द्यावयाचे प्रवास भत्ते संदर्भात मान्यता दिलेली आहे. परंतु सदरील प्रवास भत्याचे दर सालसन २००७ चे असून सध्याच्या महागाईचा विचार करता ते कालबाहय झालेले असून, दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाचे निवासभाडे सध्या रु.६०००/- द्यावे लागते, व इतरही शहरातील निवास भाडयात वाढ झालेली असल्यामूळे खालील प्रमाणे प्रवास भत्ते देण्याच्या सुधारीत विनियमास मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर.

<u>संक्षिप्त नांव व संज्ञा:-</u>

१) या विनियमांना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता व सभापती महिला बालकल्याण समिती, यांना द्यावयाचे प्रवास भत्ते देणे संबंधीचे विनियम असे संबोधण्यात येईल.

मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता व मा. सभापती महिला बालकल्याण समिती यांना द्यावयाचे प्रवास भत्ते.

१) मा. महापौर, मा. आयुक्त हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु. ८,०००/- अनुज्ञेय राहील.

२) मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु.५,०००/- अनुज्ञेय राहील.

३) मा.सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, व मा. सभापती महिला व बालकल्याण समिती हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु. ३,०००/- अनुज्ञेय राहील.

**रजिया बेगम** प्रस्तावात उपसभापती,महिला व बाल कल्याण समिती यांचा समावेश करण्यात आलेला नाही. तरी उपसभापती, महिला व बाल कल्याण समिती यांचा समावेश करण्यात यावा.

**डॉ.ललिता बोकारे** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** सौ.रजिया बेगम यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.६४** **ठराव**

केंद्र शासन व राज्य शासन यांचे वतीने महानगरपालिकेच्या विविध योजनेंच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येत असलेल्या बैठकीस दिल्ली, मुंबई येथे उपस्थित राहण्यासाठी महापौर, आयुक्त यांना निमंत्रीत करण्यात येते. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेचे प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाची मान्यता मिळविणेसाठी प्राप्त प्रस्तावाची माहिती पुरविणे, बैठकीस उपस्थित राहणे, दिलेल्या सुचनेनुसार माहिती सादर करणे ई.कामासाठी महापौर, आयुक्त यांना मुंबई व दिल्ली येथे जावे लागते, तसेच देशातील विविध महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती घेण्यासाठी वारंवार जावे लागते त्यामूळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) फ नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ठराव क्रं. १५९ दिनांक २०.०२.२००७ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व सभापती महिला बाल कल्याण समिती यांना द्यावयाचे प्रवास भत्ते संदर्भात मान्यता दिलेली आहे. परंतु सदरील प्रवास भत्याचे दर सालसन २००७ चे असून सध्याच्या महागाईचा विचार करता ते कालबाहय झालेले असून, दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाचे निवासभाडे सध्या रु.६०००/-द्यावे लागते, व इतरही शहरातील निवास भाडयात वाढ झालेली असल्यामूळे

खालील प्रमाणे प्रवास भत्ते देण्याच्या सुधारीत विनियमास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**संक्षिप्त नांव व संज्ञाः-**

१) या विनियमांना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता व सभापती महिला बालकल्याण समिती, यांना द्यावयाचे प्रवास भत्ते देणे संबंधीचे विनियम असे संबोधण्यात येईल.

मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता व मा. सभापती महिला बालकल्याण समिती यांना द्यावयाचे प्रवास भत्ते.

२) मा. महापौर, मा. आयुक्त हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास त्यांना प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु. ८,०००/- अनुज्ञेय राहील.

३) मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास त्यांना प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु.५,०००/- अनुज्ञेय राहील.

मा.सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, व मा. सभापती व उपसभापती, महिला व बालकल्याण समिती हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास त्यांना प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु. ३,०००/- अनुज्ञेय राहील

३) या विनियमाची अमलबजावणी पुर्व लक्षी प्रभावाने म्हणजे चालू आर्थिक वर्ष दि.१ एप्रिल २०१५ पासून करण्यात यावी.

**विषय क्र. ७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात येणा-या सर्व खाजगी हॉस्पीटल , मॅटनिर्टी नर्सिंग होम दवाखाने पॅथालॉजी लॅब क्लिनीक ई.नरसिंग होम ऍक्ट नुसार (रजिस्ट्रशन) नोंदणी नुतनीकरण करणे अनिवार्य आहे. राज्य शासनास शुश्रृषागृहाच्या नोंदणी करीता शुश्रृषागृह ज्या क्षेत्रामध्ये आहे ते क्षेत्र अशा शुश्रृषागृहामध्ये उपलब्ध्द असलेल्या खाटाची संख्या तिथे करण्यात येणार विशेषोपचार या गोष्टी लक्षात घेवून फि चे निरनिराळे दर विहित करण्याकरीता सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

दवाखान्यातील खाटाचा तपशिल ग्रुप व नोंदणी /पुनर नोंदणी तीन वर्षाकरीताची फिस

| अ.क्र. | दवाखान्यातील खाटाचा तपशिल | ग्रुप | नोंदणी व तीन वर्षाकरीतानुतनीकरण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २०० खाटापेक्षा जास्त | A | २०,०००/- |
| २ | १०० ते २०० | B | १५,०००/- |
| ३ | ५० ते १०० (वैयक्तीक ) | C | १०,०००/- |
| ४ | ५० ते १०० (ट्रस्ट ) | D | ७,५००/- |
| ५ | २० ते ५० खाटाव्यक्तीरिक्त वैयक्तीक | E | ५,०००/- |
| ६ | २० ते ५० ट्रस्ट | F | २,५००/- |
| ७ | १० पेक्षा कमी खाटाचे रुग्णालय | G | १,०००/- |
| ८ | पॅथालॉजी लॅब,ब्लब बॅक | H | १,०००/- |

**महापौर** प्रस्तावातील अनुक्रमांक १० पेक्षा कमी खाटाचे रुग्णालय ऐवजी २० पेक्षा कमी खाटाचे रुग्णालय अशी दुरुस्ती करुन आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.६५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात येणा-या सर्व खाजगी हॉस्पीटल , मॅटनिर्टी नर्सिंग होम दवाखाने पॅथालॉजी लॅब क्लिनीक ई.नरसिंग होम ऍक्ट नुसार (रजिस्ट्रशन) नोंदणी नुतनीकरण करणे अनिवार्य आहे. राज्य शासनास शुश्रृषागृहाच्या नोंदणी करीता शुश्रृषागृह ज्या क्षेत्रामध्ये आहे ते क्षेत्र अशा शुश्रृषागृहामध्ये उपलब्ध्द असलेल्या खाटाची संख्या तिथे करण्यात येणार विशेषोपचार या गोष्टी लक्षात घेवून खालील प्रमाणे फिसचे दर निश्चित करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

दवाखान्यातील खाटाचा तपशिल ग्रुप व नोंदणी /पुनर नोंदणी तीन वर्षाकरीताची फिस

| अ.क्र. | दवाखान्यातील खाटाचा तपशिल | ग्रुप | नोंदणी व तीन वर्षाकरीतानुतनीकरण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २०० खाटापेक्षा जास्त | A | २०,०००/- |
| २ | १०० ते २०० | B | १५,०००/- |
| ३ | ५० ते १०० (वैयक्तीक ) | C | १०,०००/- |
| ४ | ५० ते १०० (ट्रस्ट ) | D | ७,५००/- |
| ५ | २० ते ५० खाटाव्यक्तीरिक्त वैयक्तीक | E | ५,०००/- |
| ६ | २० ते ५० ट्रस्ट | F | २,५००/- |
| ७ | २० पेक्षा कमी खाटाचे रुग्णालय | G | १,०००/- |
| ८ | पॅथालॉजी लॅब,ब्लब बॅक | H | १,०००/- |

**विषय क्र.८** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका पाणी पुरवठा व मलनि:स्सारण दुरूस्ती करीता क्षेत्रिय कार्यालय क्रं.ड (सिडको) मध्ये श्री डि.एम.पाटील, कंत्राटदार हे मागील सालसन २०११-१२ पासुन काम करीत आहेत, असे समजते.क्षेत्रीय कार्यालय क्रं.ड सिडको मध्ये एकूण ०५ प्रभाग आहेत.मागील ०३ वर्षापासून संबंधित कंत्राटदारास हे त्यांना देण्यात आलेले काम करीत नसल्याचे दिसून येत आहे या भागातील पाणी गळतीमुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे व मलनि:स्सारण व्यवस्था (ड्रेनेज) तंबलेले आहेत.रस्त्यावर घाण वाहत असल्याचे अनेकवेळा प्रशासनास तोंडी व लेखी कळवुन सूध्दा संबधीत कंत्राटदाराने ही कामे केली नाहीत परंतू संबंधिताने कोटयावधी रूपयांचे देयके महापालिकेत सादर केलेली आहेत.

सध्या उप अभियेता हे अग्रिम रक्कम उचलून महापालीकेमार्फत कामे करून घेत आहेत.त्यामुळे सदरील कामाची चौकशी करण्यासाठी सिडको झोन अतर्गत येणा-या प्रभागातील सदस्यांचा समावेश करून एक चौकशी समिती गठीत करण्यासाठी व चौकशी समितीने अहवाल दिल्यानंतरच नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यास ही महानगरपालीका सर्वसाधारण सभा सर्वानूमते मान्यता देते.

**सुचकः-** संजय गंगाधर मोरे **अनुमोदकः-** अभिषेक सौदे, सौ.वैजयंती भिमराव गायकवाड, संदीप चिखलीकर, सौ.सिंदूताई पांडुरंग काकडे, डॉ.करूणा जमदाडे, इंदूबाई घोगरे, मंगलाताई देशमुख,सौ.ललिता बोकारे.

**<u>प्रशासकिय अभिप्राय</u>**

क्षेत्रिय कार्यालय झोन क्रं.५ (जूना) नविन झोन क्रं D मधील पाणी पुरवठा व मलनि:स्सारण देखभाल दुरूस्ती कामाचे कंत्राटदार श्री डि.एम.पाटील,नांदेड हे सदर झोनमध्ये सालसन २०११-१२ पासुन देखभाल दुरुस्तीच्या निविदेनूसार काम करतात संबंधित कंत्राटदार हे त्यांना दिलेले काम हे नागरीकांच्या ,स.सदस्य यांच्या प्राप्त तक्रारी व संबंधित उपअभियता,कनिष्ट अभियंता यांनी वेळोवेळी सुचित केलेली कामे करतात .सदर कंत्राटदारास त्यांच्या वावानुसार सुचिलेली कामे त्यांनी केलेली आहेत व त्यांच्या वावाच्या व्यतिरिक्त कामे हे उदा. मोठे व्हॉल्व दुरुस्त करणे,बसविणे मोठया लाईनचे गळती बंद करणे ई.कामे इतर कंत्राटदाराकडून प्रशासनाची मान्यता घेवून केली जातात.

सिडको भागातील कंत्राटदाराची दि.१.८.२०१४ ते ३१.३.२०१५ पर्यतची देयके निधी अभावी अद्याप प्रलंबित आहेत. कंत्राटदाराची देयके प्रलंबित असल्यामूळे मलनिस्सारणाची देखभाल दुरुस्तीची कामे कंत्राटदार करीत नसल्यामूळे इतर कंत्राटदाराकडून मजुर पुरवठा करुन दैनंदिन कामे दि.२१.७.२०१५ पासून करण्यात येत आहेत. व त्याचीही देयके प्रलंबित आहेत. कंत्राटदाराच्या देयका बाबत कार्यकारी अभियंता,जेएनएनयुआरएम यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून कामाची चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी आदेशित केलेले आहे.

**उमेश चव्हाण** प्रशासकीय टिप्पणीनुसार मान्यता देण्यात यावी.

**अ.सत्तार** याप्रस्तावावर निर्णय घेण्याचे अधिकार महापौरांना देण्यात यावे.

**महापौर** प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.६६** **ठराव**

वरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**<u>पुरवणी विषय पत्रिका</u>**

**विषय क्र.१**

शासन निर्णय क्र.मभवा-२०१५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.१५ ऑक्टोबर २०१५ अन्वये कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/लेवि/९३२७/२०१५ दि.२० ऑक्टोबर २०१५ नुसार नांवामनपाकेतील कार्यरत कर्मचा-यांनाही दि.१.१०.२०१५ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक ग्रेड पे च्या ११३ टक्के दराने महागाई भत्ता लागू करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.६७** **ठराव**

शासन निर्णय क्र.मभवा-२०१५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.१५ ऑक्टोबर २०१५ अन्वये कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/लेवि/९३२७/२०१५ दि.२० ऑक्टोबर २०१५ नुसार नांवामनपाकेतील कार्यरत कर्मचा-यांनाही दि.१.१०.२०१५ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक ग्रेड पे च्या ११३ टक्के दराने महागाई भत्ता लागू करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .

**विषय क्र.२**

शासन निर्णय क्र.निमवा-२०१५/प्र.क्र.५०/सेवा-४ दि.२९ जूलै २०१५ अन्वये कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/लेवि/सेनि/९३८१/२०१५ दि.२० ऑक्टोबर २०१५ नुसार मनपा असुधारीत वेतनश्रेणीतील निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे मूळनिवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर दि.१ जूलै २०१५ पासून महागाई भत्ता वाढ २०० टक्के वरुन २१२ टक्के या दराने रोखीन प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.६८** **ठराव**

शासन निर्णय क्र.निमवा-२०१५/प्र.क्र.५०/सेवा-४ दि.२९ जूलै २०१५ अन्वये कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/ लेवि/ सेनि/९३८१/२०१५ दि.२० ऑक्टोबर २०१५ नुसार मनपा असुधारीत वेतनश्रेणीतील निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे मूळनिवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर दि.१ जूलै २०१५ पासून महागाई भत्ता वाढ २०० टक्के वरुन २१२ टक्के या दराने रोखीन प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .

**विषय क्र.३**

शासन निर्णय क्र.निमवा-२०१५/प्र.क्र.७१/सेवा-४ दि.१७ ऑक्टोबर २०१५ अन्वये कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/ लेवि/ सेनि/९३८२/२०१५ दि.२० ऑक्टोबर २०१५ नुसार मनपा निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे मूळनिवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर दि.१ ऑक्टोबर २०१५ पासून महागाई भत्तावाढ १०७ टक्के वरुन ११३ टक्के या दराने रोखीन प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.६९** **ठराव**

शासन निर्णय क्र.निमवा-२०१५/प्र.क्र.७१/सेवा-४ दि.१७ ऑक्टोबर २०१५ अन्वये कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/ लेवि/ सेनि/९३८२/२०१५ दि.२० ऑक्टोबर २०१५ नुसार मनपा निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे मूळनिवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर दि.१ ऑक्टोबर २०१५ पासून महागाई भत्तावाढ १०७ टक्के वरुन ११३ टक्के या दराने रोखीन प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .

**विषय क्र.४**

नांवामनपाची आर्थिक परिस्थिती पाहता तसेच राज्य शासनाने १ ऑगस्ट २०१५ पासून स्थानिक संस्था कर रध्द केला असल्याने महानगरपालिकेस लागणारा दर महा बांधील खर्च देखील भागवणे अशक्य झाले आहे. त्यामूळे शहरातील विकास कामे हाती घेणे अवघड झाले आहे.JNNURM व नगरोत्थान अशा विविध योजनेतुन झालेल्या विकास कामाचे दैनंदिन व देखभाल दुरुस्ती करणे करीता लागणा-या खर्चातही वाढ होत आहे. ज्यामूळे शहरातील नागरीकांना सुविधा देणेही शक्य होत नाही. शासनाच्या योजनेतील विकास कामासाठी लागणारा महानगरपालिकेचा वाटा भरण्यासाठी निधी नसल्यामूळे कामे अर्धवट राहिले आहेत. करीता महानगरपालिका हध्दीत विविध कराची व उपकराची आकारणी करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्यक झाले आहे. यासर्व बाबीचा विचार करता महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये लावण्या जोगे कराचा अभ्यास करणे व विविध कायद्याचा विचार करुन उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याकरीता सल्लागाराची नियुक्ती करुन त्यानुसार आवश्यक उपाय योजना अमलात आणणे सोईचे होईल करीता प्रस्तावास मान्यता देणे बाबत.

**अशोक उमरेकर** महानगरपालिकेत सक्षम अधिकारी नाहीत काय,सल्लागार नेमण्याची काय गरज आहे.महानगरपालिकेतील हुशार व सक्षम अधिका-याची आमच्याकडे लिस्ट आहे. यापैकी फक्त एक दोन अधिकारी दारु पिवून काम करतात.याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** यापुर्वी महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम, बिएसयुपी योजनेची चांगल्या प्रकारे अमलबजावणी होण्यासाठी आयएलएफएस,अपिल सारख्या कंपन्यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता दिलेली आहे.महानगरपालिकेचे उत्पन्न कशा प्रकारे वाढ करता येईल याचा अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी सल्लागार नेमण्याचा प्रस्ताव दिलेले आहे.याबाबत सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आयुक्त साहेबांनी महानगरपालिकेचे उत्पन्न कशा प्रकारे वाढविता येईल याचा अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी सल्लागार नेमण्याचा अत्यंत चांगला प्रस्ताव दिलेला आहे त्याबध्दल मी आयुक्त साहेंबाचे अभिनंदन करतो.केंद्र शासनाकडे सक्षम अधिकारी असतांनाही सुध्दा स्मार्ट सिटी, अमृत अश्या विविध योजना राबविण्यासाठी कन्सलटंट नेमलेले आहे. महागनरपालिकेनेही जेएनएनयुआरएम,बिएसयूपीच्या कामासाठी कन्संलटंट नेमले होते व त्यांच्या सल्यानेच रु.२०००/-ची विकासाची कामे पुर्ण करण्यात आलेली आहे.त्यामूळे आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**मोहिनी कनकदंण्डे** जाहिरात व फलक बोर्ड लावण्यास परवानगी देण्याकरीता नियम तयार करण्यात आलेले आहेत परंतु या नियमात इलेक्ट्रानिक्स बोर्डाचा समावेश करण्यात आलेला नसल्यामूळे इलेर्क्टानिक्स बोर्ड लावण्यास परवानगी देण्यात येत नाही. लावण्याचे संदर्भात परवानगीचा

**आयुक्त** अनावधानाने नियमात इलेक्ट्रानिक्स बोर्डचा समावेश करण्याचे राहून गेलेले आहे जाहिरात नियमात दुरुस्ती करण्यात येईल.

**महापौर** आयुक्ताचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.७०** **ठराव**

नांवामनपाची आर्थिक परिस्थिती पाहता तसेच राज्य शासनाने १ ऑगस्ट २०१५ पासून स्थानिक संस्था कर रध्द केला असल्याने महानगरपालिकेस लागणारा दर महा बांधील खर्च देखील भागवणे अशक्य झाले आहे. त्यामूळे शहरातील विकास कामे हाती घेणे अवघड झाले आहे.JNNURM व नगरोत्थान अशा विविध योजनेतुन झालेल्या विकास कामाचे दैनंदिन व देखभाल दुरुस्ती करणे करीता लागणा-या खर्चातही वाढ होत आहे. ज्यामूळे शहरातील नागरीकांना सुविधा देणेही शक्य होत नाही. शासनाच्या योजनेतील विकास कामासाठी लागणारा महानगरपालिकेचा वाटा भरण्यासाठी निधी नसल्यामूळे कामे अर्धवट राहिले आहेत. करीता महानगरपालिका हध्दीत विविध कराची व उपकराची आकारणी करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्यक झाले आहे. करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये लावण्या जोगे विविध कराचा अभ्यास करणे व विविध कायद्याचा विचार करुन उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याकरीता सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी व सल्लागाराचे मानधनावर लागणा-या खर्चास प्रशासयकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.तसेच सल्लागाराची निवड करण्याचे व त्यांचे मानधन निश्चित करण्याचे अधिकार आयुक्त नांवमनपान नांदेड यांनाही सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. सल्लागार यांनी उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी सुचविलेल्या उपाय योजनेचा अहवाल सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा सदरील अहवालावर सर्वसाधारण सभा निर्णय घेईल असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.५**

तत्कालिन नांदेड नगरपरिषदेच्या काळापासून नांदेड शहरातील संपुर्ण कचरा सर्व्हे नं.१६१ मौजे नंदेड हैदरबाग येथील डंपिंग ग्रावुंडवर साठवला जात होता.कालांतराने नांदेड नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत होवून व्याप्ती वाढली व हैदरबाग येथील लोकसंख्या वाढल्यामूळे लोकांचा विरोध लक्षात घेता याठिकाणी कचरा टाकणे बंद करुन तुप्पा येथील जागेवर कचरा साठवण्यात येत आहे.

हैदरबाग येथील डंपिंग ग्रावुंडवर साठवलेला कचरा हटविणे त्यावर प्रक्रिया करणे यासाठी याक्षेत्रातील तज्ञाचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**अ.सत्तार** हैदरबाग येथील डम्पींग ग्रावुड वरील साचलेला कचरा हटविण्यासाठी जो प्रस्ताव दिला त्याबध्दल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. लवकरात लवकर कचरा हटविण्याचे काम हाती घेवून ते पूर्ण करण्यात यावे.व डंम्पीग ग्रावुडचा विकास करण्यात यावा.

**स.शेर अली** आयुक्त साहेबांनी जो प्रस्ताव दिला आहे तो अत्यंत चांगला प्रस्ताव आहे त्याबध्दल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. हैदरबाग येथील डम्पींग ग्रावुंडवर मोठया प्रमाणात कचरा साठलेला असल्यामूळे तेथील दलित वस्तीत राहणा-या नागरीकांना खुप त्रास होत आहे. लवकरात लवकर डिपीआर तयार करुन कचरा हटविण्यात यावा.माझी विनंती आहे की हे काम १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात यावे.

**विनय पाटील** सिडको हडको भागातही डम्पींग ग्रावुंड असून अनेक दिवसापासून त्या ठिकाणी मोठया प्रमाणात कचरा साठलेला असल्यामूळे तो हटविण्याचाही विचार करण्यात यावा जेणे करुन त्या ठिकाणी स्मशानभूमीचा विस्तार करता येवू शकेल.

**महापौर** हैदरबाग येथील डंपिंग ग्रावुंडवर अनेक वर्षापासुन साठवलेला कचरा हटविणे त्यावर प्रक्रिया करणे यासाठी याक्षेत्रातील तज्ञाचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यासाठीचे पुर्ण अधिकार आयुक्त नांवामनपा नांदेड यांना देण्यात येते तसेच .व यासाठी लागणा-या खर्चासही मान्यता देण्यात येते, व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.७१** **ठराव**

तत्कालिन नांदेड नगरपरिषदेच्या काळापासून नांदेड शहरातील संपुर्ण कचरा सर्व्हे नं.१६१ मौजे नंदेड हैदरबाग येथील डंपिंग ग्रावुंडवर साठवला जात होता.कालांतराने नांदेड नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत होवून व्याप्ती वाढली व हैदरबाग येथील लोकसंख्या वाढल्यामूळे लोकांचा विरोध लक्षात घेता याठिकाणी कचरा टाकणे बंद करुन तुप्पा येथील मनपाकेने संपादित केलेल्या जागेवर कचरा साठवण्यात येत आहे. हैदरबाग येथील डंपिंग ग्रावुंडवर अनेक वर्षापासुन साठवलेला कचरा हटविणे त्यावर प्रक्रिया करणे यासाठी याक्षेत्रातील तज्ञाचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यासाठीचे पुर्ण अधिकार आयुक्त नांवामनपा नांदेड यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .व यासाठी लागणा-या खर्चासही प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुते देते , व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६**

मनपाचे अशोकनगर येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात नागरीक आपले पाळील श्वान उपचारासाठी आणतात.पाळीव श्वानांना इतर कोणत्याही प्रकारचे आजार होवू नये यासाठी ८ इन वन लस देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदरील लस मनपा प्रशासन नागरीकांना रु. ३५०/- उपलब्ध्द करुन देण्यात येईल. करीता सदरील लसचे दर मान्यता करीता प्रस्ताव सादर.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** शहरात मोठया प्रमाणात कोचिंग क्लासेस सुरु असून या कोचिंग क्लासेसना कोणत्याही प्रकारचा कर आकारल्या जात नाही तरी कोचिंग क्लासेसला विशेष कर लावता येईल याचा विचार करण्यात यावा.

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.७२** **ठराव**

नांवामनपा अशोकनगर येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात नागरीक आपले पाळील श्वान उपचारासाठी आणतात पाळीव श्वानांना इतर कोणत्याही प्रकारचे आजार होवू नये यासाठी ८ इन वन लस देण्याची व्यवस्था करण्यात आलेली असून सदरील लसीचा व लस देण्याचे खर्च म्हणुन सबंधिताकडून रु. ३५०/- शुल्क वसुल करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अग्नीशमन विभागाकडे सध्यस्थितीत कार्यालयीन इमारत व अग्नीशमन वाहने ठेवण्याकरीता पुरेशी व्यवस्था नसल्यामूळे श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम येथे तात्पुरत्या स्वरुपात कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील लेबर कॉलनी येथे अग्नीशमन विभागाचे शेड व कार्यालय तसेच कर्मचारी निवासस्थान असून सदर जागा ही शहराच्या मध्यवर्ती असून या स्थळापासून शहरातील सर्व भागापर्यत अग्नीशमन सेवा योग्य रितीने पुरविणे शक्य होणार आहे.सदरच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ २०८१.११ चौ.मि.आहे. सदर जागेत अग्नीशमन विभागाचे कार्यालय,वाहनतळ,समोरील बाजुने दुकान केंद्र परेड ग्रावुड प्रशिक्षण हॉल इत्यादी सोई सुविधा युक्त बांधकाम करुन वापर केल्यास दुकान केंद्रापासून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळू शकेल. तसेच अग्नीशमन विभागास कार्यालयीन इमारत ,वाहनतळ,कर्मचारी निवासस्थान तसेच कवायतीसाठी जागा उपलबध्द होईल.

वरील बाबीचा अंतर्भाव करुन सदर इमारतीचा आराखडा वास्तुशास्त्रज्ञ श्री कु-हे याचेकडून तयार करण्यात आला असून आराखडयानूसार इमारतीचे ठळक वैशिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१) जागेचे क्षेत्रफळ :- २०८१.११ चौ.मि
२) Wing I मध्ये तळमजल्यावर अग्नीशमन टेंडरसाठी आर.सी.सी.शेड एकूण -३ वाहनासाठी (एकूण क्षेत्रफळ २०२.६६ चौ.मी.)
३) Wing I I मध्ये कंट्रोल रुम.स्टोअर रुम्, Rest Room (एकूण क्षेत्रफळ ३४.९२ चौ.मी.)
४) Wing II व III मधील तळमजल्यावर व्यापारी गाळे एकूण १६ दुकाने

- ४ (२.९० X ४.२३) = ४९.०६८
- ४ (२.२३ X ४.२३) = ३७.७३
- ४ (२.११ X ४.२३) = ४९.०६८
- ४ (३.०० X ४.२३) = <u>५०.७६</u>

१७३.२६ चो.मि.

५) Wing II व III मध्ये कर्मचा-यासाठी एकूण २२ निवासस्थाने व वाहनतळ यांचा समावेश आहे.
६) Wing IV मध्ये अधिका-यासाठी एकूण ३निवास्थाने आहेत.
७) पहिल्या मजल्यावर प्रशिक्षण हॉल,कार्यालय,ड्रिल टॉवर यांची व्यवस्था Wing IIमधील करण्यात आली आहे.

प्रस्तावित रेखानकाशानुसार ०.९९७ एफएसआय वापरण्यात आला असून जी G+३ बांधण्याचे प्रस्तावित आहे.

सध्यस्थितीत लेबरकॉलनी येथील एसआरटी मधील गाळे क्र.१,३,४,५,६,७,२०,२२,२३ व २४ तसेच डिआरटी मधील गाळा क्र.१ व ७ हे महागनरपालिकेच्या ताब्यात आहेत. त्यामध्ये अग्नीशमन विभागातील व इतर विभागातील कर्मचारी राहत आहेत.

क्षेत्रिय कार्यालय क्र.१ शिवाजीनगर यांना दि.२०.४.२०१५ रोजी पत्र देवून लेबर कॉलनी येथील एसआरटि मधील गाळा क्र.१ व २४ समोरील मोकळया जागेमध्ये राहत असलेल्या व गाळा क्र.२ मधील मालमत्ताधारकांची माहिती मागविण्यात आली असता त्यांनी खालील प्रमाणे माहिती दिली आहे.

१) एसआरटि गाळा क्र.२ महमंद शाकील अहेमद याचे नाव असून त्यांचा मालमत्ता क्र.१.८.१३६ आहे.
२) तसेच एसआरटि मधील गाळा क्र.१ व २४ समोरील मोकळया जागेमध्ये
    १) १.८.१३१ मनपाज/प्रयागाबाई सोनकांबळे
    २) १.८.१३२ मनपाज/तुकाराम उमाजी
    ३) १.८.१३३ मनपाज/ रामचंद्र उमाजी सोनकांबळे
    ४) १.८.१३४ मनपाज/उमाजी राकोजी सिताराम सोनकांबळे याचे नावे मालमत्ता असल्याबाबत कळविलेले आहे.

महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियांना अंतर्गत लेबरकॉलनी येथे अग्नीशमन केंद्र उभारण्यासाठी ३५ टक्के शासनाचा हिस्सा व ६५ टक्के मनपा निधी या तत्वावर बांधकाम करण्यात येणार असून त्यासाठी शासनाकडे सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मान्यतेवसाठी पाठविण्यात आला आहे पण जागेच्या पिआर कार्ड अभावी प्रंलबित आहे.

म्हाडा यांनी मोकळया जागेचे मुल्य आताच्या जास्त दराने मागणी केली आहे.१९८६ मध्ये जागा हस्तांतरण झालेले असल्यामूळे त्यावेळेसचा दर आकारण्याकरीता विनंती केली आहे. परंतु त्यास मान्यता नाही. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. त्यामूळे उर्वरीत जागेची आखीव पत्रिकासह प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे योग्य.

महानगरपालिकेचे गाळे व मोकळी जागा यात सलग्नता येण्यासाठी एक खाजगी घराचे आदलाबदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी जागा मालकास वाटाघाटीसाठी बोलावणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे १ ते ७ बाबींचा समावेश करुन कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी सालसन २०१४-१५ च्या जिल्हा दर सुची नुसार रक्कम रुपये ५,३०,९७,०००/- (रुपये पाच कोटी तीस लक्ष सत्यान्नव हजार फक्त) चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

अर्थसंकल्प २०१५-१६ मध्ये नविन इमारत या शिर्षाखाली रु. ४.०० कोटीची तरतुद ठेवण्यात आलेली असून सदर कामासाठी मनपा निधीमधुन रुपये ३,४५,१३,०५०/- व शासन निधी रुपये १,८५,८३,९५०/- असे एकूण लागणारा खर्च रुपये ५,३०,९७,०००/- यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे बाबत.

**उमेश चव्हाण** एवढा मोठया प्रमाणात खर्च करण्याची महागरपालिकेची क्षमता आहे काय

**आयुक्त** केंद्र शासनाची योजना असून केद्र शासनाकडून एकूण किंमतीच्या ३५ टक्के निधी महानगरालिकेस मिळणार असून उर्वरीत निधी १३ व्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून घेता येईल.

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.७३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अग्नीशमन विभागाकडे सध्यस्थितीत कार्यालयीन इमारत व अग्नीशमन वाहने ठेवण्याकरीता पुरेशी व्यवस्था नसल्यामूळे श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम येथे तात्पुरत्या स्वरुपात कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील लेबर कॉलनी येथे अग्नीशमन विभागाचे शेड व कार्यालय तसेच कर्मचारी निवासस्थान असून सदर जागा ही शहराच्या मध्यवर्ती असून या स्थळापासून शहरातील सर्व भागापर्यत अग्नीशमन सेवा योग्य रितीने पुरविणे शक्य होणार आहे.सदरच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ २०८१.११ चौ.मि.आहे. सदर जागेत अग्नीशमन विभागाचे कार्यालय,वाहनतळ,समोरील बाजुने दुकान केंद्र परेड ग्रावुड प्रशिक्षण हॉल इत्यादी सोई सुविधा युक्त बांधकाम करुन वापर केल्यास दुकान केंद्रापासून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळू शकेल. तसेच अग्नीशमन विभागास कार्यालयीन इमारत ,वाहनतळ,कर्मचारी निवासस्थान तसेच कवायतीसाठी जागा उपलबध्द होईल.

वरील बाबीचा अंतर्भाव करुन सदर इमारतीचा आराखडा वास्तुशास्त्रज्ञ श्री कु-हे याचेकडून तयार करण्यात आला असून आराखडयानूसार कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी सालसन २०१४-१५ च्या जिल्हा दर सुची नुसार तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये ५,३०,९७,०००/- (रुपये पाच कोटी तीस लक्ष सत्यान्नव हजार फक्त) (मनपा निधीमधुन रुपये ३,४५,१३,०५०/- व शासन निधी रुपये १,८५,८३,९५०/- असे एकूण लागणारा खर्च रुपये ५,३०,९७,०००/-) ला प्रशासकीय व आर्थिक मान्यता नांवामनपा सालसन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील नविन इमारत या शिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या रु. ४.०० कोटीच्या तरतूदीतून ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

तसेच प्रस्तावात नमूद करण्यात आल्या प्रमाणे म्हाडा यांनी मोकळया जागेचे मुल्य आताच्या दराने देण्याची मागणी केली आहे.परंतु सदर जागा १९८६ मध्ये तत्कालिन नांदेड नगरपालिकेस हस्तांतरण झालेली असल्यामूळे त्यावेळेसचा दर आकारण्याकरीता विनंती केली असून अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही पण जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. त्यामूळे उर्वरीत जागेची आखीव पत्रिकासह प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच महानगरपालिकेचे गाळे व मोकळी जागा यात सलग्नता येण्यासाठी एक खाजगी घराचे आदलाबदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी सबंधित जागा मालकास वाटाघाटीसाठी बोलावून त्यांची जागा महानगरपालिकेस हस्तांरीत करण्यासाठी आयुक्त नांवामनपा नांदेड यांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.८**

श्री विजय जोशी, निर्मिती/संकल्पना/संयोजक, सैनिक हो तुमच्यासाठी यानी दि.३.१०.२०१५ च्या अर्जान्वये विनंती अर्ज सादर करुन कळविले आहे की, मुंबई येथे २६ मार्च नोंव्हेंबर २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच सर्वत्र देशभक्तीची भावना जागृत व्हावी यासाठी मराठवाडयात सैनिक हो तुमच्यासाठी हा देशभक्तीपर आधारीत कार्यक्रम आयोजित केला जात आहे त्यानुसार मनपातर्फे सदरील कार्यक्रम २६ नोव्हेंबर २०१५ रोजी आयोजित करण्यात यावा या कार्यक्रमात मराठवाडा व बाहेरील जवळपास ५० कलावंत सहभागी होणार असल्यामूळे महानगरपालिकेने सदर कार्यक्रमास आर्थिक मदत करावी मदत करावी अशी विनंती केली आहे करीता सैनिक हो तुमच्यासाठी या सांस्कृतीक कार्यक्रमानिमित्य रक्कम रु. १,००,०००/- (अक्षरी रु.एक लक्ष फक्त) ची आर्थिक मदत करण्यास मान्यता देणे बाबत.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** शहरातील विविध सामाजिक संस्था, प्रतिष्ठान हे सांस्कृतीक कार्यक्रमासाठी आर्थिक मदत देण्यासाठी विंनती अर्ज सादर करतात त्यांना अशा प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी रु.५०,०००/-पर्यतची आर्थिक मदत देण्याचे संदर्भात निर्णय घेण्यासाठी महापौर यांच्या अध्यक्षतेखाली, उपमहापौर, सभापती, स्थायी समिती, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, सभापती, महिला व बाल कल्याण समिती यांची एक उपसमिती कायम करण्यात यावी. या

उपसमितीने केलेल्या शिफारशीनूसार रु.५०,०००/-ची आर्थिक मदत देण्याची पुढील वैधानिक कार्यवाही करावी असा माझा प्रस्ताव आहे. त्यास मान्यता देण्यात यावी.

**अ.सत्तार** श्री विरेद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** श्री विजय जोशी, निर्मिती/ संकल्पना/ संयोजक, सैनिक हो तुमच्यासाठी यांना सैनिक हो तुमच्यासाठी या सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी रु.५०,०००/-ची आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात येते तसेच श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ७४** **ठराव**

श्री विजय जोशी, निर्मिती/ संकल्पना/ संयोजक, सैनिक हो तुमच्यासाठी यांनी दि.३.१०.२०१५ च्या अर्जान्वये मुंबई येथे २६ मार्च नोंव्हेंबर २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच सर्वत्र देशभक्तीची भावना जागृत व्हावी यासाठी नांदेड शहरात सैनिक हो तुमच्यासाठी हा देशभक्तीपर आधारीत कार्यक्रम दि. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी आयोजित करण्यात येणार असून या सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता मराठवाडा व बाहेरील जवळपास ५० कलावंत सहभागी होणार असल्यामूळे सदर कार्यक्रमासाठी आर्थिक मदत देण्याची विनंती केली आहे. करीता श्री विजय जोशी, निर्मिती/ संकल्पना/ संयोजक, सैनिक हो तुमच्यासाठी यांना दि. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी सैनिक हो तुमच्यासाठी या सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे रु.५०,०००/-ची आर्थिक मदत देण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

यापुढे आर्थिक वर्षात अशा प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी महानगरालिका हध्दीतील विविध संस्थेला/ प्रतिष्ठानला रु.५०,०००/-पर्यतची आर्थिक मदत देण्याचे संदर्भात निर्णय घेण्यासाठी महापौर यांच्या अध्यक्षतेखाली, उपमहापौर, सभापती, स्थायी समिती, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, सभापती, महिला व बाल कल्याण समिती यांची एक उपसमिती कायम करण्यास मान्यता देण्यात येते. या उपसमितीने केलेल्या शिफारशीनूसार अशा सांस्कृतिक कार्यक्रमास संबंधित संस्थेला/ प्रतिष्ठानला रु.५०,०००/-ची आर्थिक मदत देण्याबाबत आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ९** **प्रस्ताव**

नांदेड शहर महानगरपालिकेत उपायुक्त पदी कार्यरत असतांना विद्या गायकवाड यांनी वाहन भत्ता या सत्राखाली महापालिकेचा आर्थीक नुकसान केल्याचे बातम्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस आल्या होत्या त्या बातम्यांचा अनुषंगाने आपल्या कार्यालयाकडून चौकशी केली का ? चौकशी अंती कांही दोष निषपन्न झाले का ? झाल्यास कोणती कार्यवाही प्रस्तावित झाली सखोल माहिती सभागृहपुढे ठेवावी व सभागृहाने चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**सुचक :-** गफार खान गुलाम महमंद खान **अनुमोदकः-** सय्यद शेर अली, स. गिल सरजीतसिंघ मेजर पंजाबसिंघ

**गफार खान** मी माझा परत घेत आहे.

**महापौर** सदस्यांनी आपला प्रस्ताव परत घेतलेला असल्यामूळे प्रस्ताव विषय पत्रिकेतून वगळण्यात येतो.

**विषय क्रं. १०** **प्रस्ताव**

नांदेड शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्रं. ११६ दिनांक २४.११.२०१४ अन्वये पृ.क्रं. १९ व मिल एरियातील ब-याच नागरीकांना कराचा मागणी बिलात संगणकाचा चुकीमुळे जास्तीचे कर व अनाधिकृत बांधकामात शास्ती करा पेक्षा जास्त दंड लागलेले असल्याने नागरीक मालमत्ताधारक संगणकाचा चुकीच्या दुरुस्ती करुन कर मागणी बिल मिळतील या अपेक्षेने कराचा भरणा केलेले नाही म्हणून हि सर्व साधारण सभा जे नागरीकांना चूकीचे मागणी बिले दिलेले आहे ते रद्द करुन पुनश्च नविन सुधारीत मागणी बिल व त्या भागातील रहिवाश्यांना सर्वे करुन ज्यांना पुनर कर आकारणीत घर नंबर मिळाले नाही त्यांचा सर्वे करुन नविन घर नंबर देण्याचा प्रस्ताव पारीत करण्यात येते..

**सुचक :-** गफार खान गुलाम महमंद खान **अनुमोदकः-** सय्यद शेर अली, स. गिल सरजीतसिंघ मेजर पंजाबसिंघ

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

_ नांवामनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.११६ दि.२४ नोंव्हेंबर २०१४ व्दारे नियमानूसार कागदपत्रे प्रकरण निहाय सादर केल्यास नियमानुसार कर आकारणी करण्यात यावी असे ठरविण्यात आले आहे.

स.सदस्यांनी संगणकीय चुकामूळे मालमत्ता कर जास्त लागला आहे व अनाधिकत बांधकाम शास्ती लागली आहे असे नमूद केले आहे. वास्तविक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम २६७ अ नुसार अवैध बांधकाम वा पुर्नर बांधकामांना अनाधिकृत बांधकामाना शास्ती लावण्यात आली आहे. तथापी तसे प्रकरण निहाय अर्ज सादर केला तर त्याबाबत खात्री करुन आवश्यक तेथे दुरुस्ती केली जाईल व सध्या करण्यातही येत आहे. त्यामूळे मालमत्ता निहाय प्रकरण सादर करावेत. त्यानुसार सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी मार्फत स्थळ पाहणी करुन आवश्यक ती दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच ज्या मालमत्ताना कर आकारणी झाली नाही त्याची कर आकारणी करण्यात येईल.

**गफार खान** माझ्याकडे मालमत्ता कराच्या संदर्भात प्रभागातील मिल एरियातील ३००-३५० नागरीक आले होते त्यांनी एकत्रित मालमत्ता कर रु.४००/- आणि त्यावर ५-६ हजार रुपये शास्ती आकारल्याच्या तक्रारी केलेल्या

आहेत. हे सर्व नागरीक झोपडपटी भागातील असून त्यांचे घराचे बांधकाम हे कच्या स्वरुपाचे व टिनशेडचे आहेत. संगणकाच्या चुकीमूळे जास्तीचे कर व अनाधिकृत बांधकामात शास्ती करा पेक्षा जास्त दंड लागलेले असल्याने संगणक चुकीची दुरुस्ती करुन कर मागणी बिल देण्यात यावे अशी मी एक वर्षापासून मागणी करीत आहे परंतू त्याची अमलबजावणी होत नाही.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यास मान्यता देत असताना सर्वसाधारण सभेने झोपडपटी भागातील ज्या घराचे बांधकाम हे कच्या स्वरुपाचे टिनशेडचे बांधकाम आहे अशा घरांना अनाधिकृत बांधकाम समजण्यात येवू नये व शास्ती दंड आकारण्यात येवू नये अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे त्यामूळे घरांना शास्ती दंड आकारण्यात आलेली असेल तर जी माफ करण्यात यावी.

**महापौर** प्रशासकीय टिप्पणी नुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येते .

**ठराव क्र.७५** **ठराव**

नांवामनपा हद्दीतील मिल एरियातील ब-याच नागरीकांना कराचा मागणी बिलात संगणकाचा चुकीमुळे जास्तीचे कर व अनाधिकृत बांधकामात शास्ती करा पेक्षा जास्त दंड आकारण्यात आल्याची तक्रार करण्यात आलेली आहे. तरी ज्या नागरीकांना कराचा मागणी बिलात संगणकाचा चुकीमुळे जास्तीचे कर व अनाधिकृत बांधकामात शास्ती करा पेक्षा जास्त दंड आकारण्यात आलेला आहे त्यांनी संबंधित सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी, नांवामनपा नांदेड याचेकडे वैयक्तीकरित्या सर्व कागदपत्राच्या पुराव्यासह विनंती अर्ज रितसर सादर करावा. सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी संबंधित घराची स्थळ पाहणी करुन आवश्यक ती दुरुस्ती करण्याची कार्यवाही करावी तसेच मिल एरियातील मालमत्तांचा सर्वे करुन ज्यांना पुनर कर आकारणीत घर नंबर मिळाले नाही त्यांना नविन घर नंबर देण्याची कार्यवाही करावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुते संमत करते.

**विषय क्र.११** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा अंतर्गत जे व्यावसायीक, घरगुती किंवा सार्वजनिक वापरासाठी महापालीकेतर्फे नागरीकांना नळ जोडणी देण्यात येते.परंतू ब-याच ठिकाणी नळाला नागरीक तोटया बसवित नसल्यामुळे मोठया प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत आहे. चालू वर्षा पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असुन शहरामध्ये पाण्याची तीव्र टंचायी भासत आहे महापालीकेतर्फ ज्या नळधारकांच्या नळांना तोटया नाहीत अशा नळधारकांवर पाणी पुरवठा विभागातर्फ त्वरीत उपाययोजना करण्यात यावी व शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी पाण्याची गळती आहे ती त्वरित दुरुस्त करून घेण्यात यावी.याबाबत करण्यात आलेला कारवाई तपशिल पुढील सर्वासाधारण सभेसमोर मांडण्यात यावा.

**सुचक** :- डॉ.विश्वास बालाजीराव कदम **अनुमोदक** :-नवल ओमप्रकाश पोकर्णा,संजय मोरे,सौ.जिंदम पार्वती व्यंकटेश ,मंगलाताई गजानन देशमुख.

**महापौर** स.सदस्यांचे प्रस्तावानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.७६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा अंतर्गत जे व्यावसायीक, घरगुती किंवा सार्वजनिक वापरासाठी महापालीकेतर्फे नागरीकांना नळ जोडणी देण्यात येते.परंतू ब-याच ठिकाणी नळाला नागरीक तोटया बसवित नसल्यामुळे मोठया प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत आहे. चालू वर्षा पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असुन शहरामध्ये पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे महापालीकेतर्फ ज्या नळधारकांच्या नळांना तोटया नाहीत अशा नळधारकांवर पाणी पुरवठा विभागातर्फ त्वरीत उपाययोजना करण्यात यावी व शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी पाण्याची गळती आहे ती त्वरित दुरुस्त करून घेण्यात यावी.व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्वसारण सभेस देण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१२** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,हददीतील लोकशाही अण्णाभाउ साठे चौकातील लोकमान्य मेडीकल कॉर्नर पासून टाउन मार्कट श्रीमंगले कॉर्नर,चिंतावार कॉर्नर,दत्तनगर बाफना ओव्हरब्रिजच्या मुख्य रस्त्या पर्यंतचा रस्ता हा वेगवेगळया तीन प्रभागांना जोडणारा मुख्य रस्ता असून या रस्यावर माठया प्रमाणावर वर्दळ असते परंतू मागील वीस ते पंचवीस वर्षा पासून या रस्त्याची दुरवस्था झालेली असून पावसाळया मध्ये या रस्त्यावर वाहन चालवीणे तर शक्य नाहीच व नागरीकांना पायी चालणे सुध्दा कठीण होत असते.

त्यामुळे शासनाच्या विशेष निधीतुन किंवा इतर कोणत्याही निधी अंतर्गत सदर रस्ता सी.सी.रस्ता करणेसाठी ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- अशोक रावणराव उमरेकर **अनुमोदक** :- सौ.जयश्री आनंद जाधव,दिपकसिंघ काशीनाथसिंघ रावत

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.आयुक्तानी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.७७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,हददीतील लोकशाही अण्णाभाउ साठे चौकातील लोकमान्य मेडीकल कॉर्नर पासून टाउन मार्कट श्रीमंगले कॉर्नर,चिंतावार कॉर्नर,दत्तनगर बाफना ओव्हरब्रिजच्या मुख्य रस्त्या पर्यंतचा रस्ता हा वेगवेगळया तीन प्रभागांना जोडणारा मुख्य रस्ता असून या रस्यावर माठया प्रमाणावर वर्दळ असते परंतू मागील वीस ते पंचवीस वर्षा पासून या रस्त्याची दुरवस्था झालेली असून पावसाळया मध्ये या रस्त्यावर वाहन चालवीणे तर शक्य नाहीच व नागरीकांना पायी चालणे सुध्दा कठीण होत असते.

त्यामुळे शासनाच्या विशेष निधीतुन किंवा इतर कोणत्याही निधी अंतर्गत सदर रस्ता सी.सी.रस्ता करणेसाठी ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१३** **प्रस्ताव**

नांवामनपा अंतर्गत मनपाच्या मराठी माध्यमाच्या ६ शाळा,उर्दू माध्यमाच्या ६ शाळा,संयुक्त (मराठी व उर्दू) माध्यम ३ अशा एकूण १५ प्राथमिक शाळा आहेत. सदरील शाळांमध्ये मराठी माध्यम पदविधर १, सहशिक्षक ५, उर्दू माध्यम सह शिक्षक ४ अशी पदे रिक्त आहेत. सदर पदासाठी शासनामार्फत ५० टक्के अनुदान प्राप्त होते.

मनपा शाळामध्ये बहुतांश गोरगरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात शिक्षकांच्या कतरतेमूळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी त्या अनुषंगाने सदरील पदे त्वरीत भरण्यात यावी.

**सुचक** :- सौ.सविता मारोतराव कंठेवाड **अनुमोदक :-** रजिया बेगम अयुब खॉ

<u>**शिक्षण विभागाची प्रशासकिय टिप्पणी**</u>

सदरील ठरावान्वये नांवामनपा अंतर्गत मनपाच्या मराठी माध्यमाच्या ६ शाळा,उर्दू माध्यमाच्या ६ शाळा,संयुक्त (मराठी व उर्दू) माध्यम ३ अशा एकूण १५ प्राथमिक शाळा आहेत. सदरील शाळांमध्ये मराठी माध्यम पदविधर १, सहशिक्षक ५, उर्दू माध्यम सह शिक्षक ४ अशी पदे रिक्त आहेत. सदर पदासाठी शासनामार्फत ५० टक्के अनुदान प्राप्त होते.मनपा शाळामध्ये बहुतांश गोरगरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात शिक्षकांच्या कतरतेमूळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी त्या अनुषंगाने सदरील पदे त्वरीत भरण्यात यावीत, असा प्रस्ताव सादर केलेला आहे त्याअनूषंगाने राज्यातील प्राथमिक शाळेतील सहशिक्षकांची भरती करण्याचे अधिकार हे शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे यांना असल्यामुळे महानगरपालीका स्तरावर प्राथमिक सहशिक्षकांची भरती करता येणार नाही संदर्भ क्रं २ अन्वये सध्यास्थितीत मराठी माध्यामाची ५ पदे आणि उर्दु माध्यमाची ४ अशी एकूण ९ सहशिक्षकांची पदे रिक्त असल्याचे कळवून सदर रिक्त पदावर पात्र उमेदवार उपलब्ध करून देण्याबाबत मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे यांना विनंती पत्र दिलेले आहे तसेच विभागाकडुन रिक्त असलेल्या पदविधर सहशिक्षकांबाबत कार्यवाही चालु आहे

<u>**अस्थापना शिक्षण विभागाची प्रशासकिय टिप्पणी**</u>

उपरोक्त संदर्भीय विषयी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सह शिक्षक या अभिनाम पदाचे संचमान्यतेनुसार उर्दु माध्यमाची 28 व मराठी माध्यमाची 40 अशी एकूण 68 पदे मंजूर असून त्यापैकी आजमितीस 9 पदे रिक्त आहेत. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकांतर्गत मान्यता प्राप्त एकूण 17 शाळा असून त्यापैकी 2 विनाअनुदानित माध्यमिक शाळा व उर्वरित 15 मान्यता प्राप्त प्राथमिक शाळा चालविण्यात येतात. या शाळांमध्ये सद्यस्थितीत 59 सहशिक्षक कार्यरत असून मराठी माध्यम – 5, उर्दु माध्यम - 4 अशी आजमितीस एकूण 09 पदे रिक्त आहेत.

तसेच, माहे डिसेंबर 2012 मध्ये सहाय्यक आयुक्त मा.व.क. विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद, यांच्याकडून सहशिक्षक या अभिनामाची बिंदुनामावली प्रमाणित करून घेतल्यानुसार खालीलप्रमाणे 11 पदांचा अनुशेष शिल्लक आहे. अनु.जाती - 01, अनु.जमाती - 03, भज(ब) - 02, भज(क) - 01, भज(ड) - 01, विमाप्र - 01, इमाव - 2 असा अनुशेष शिल्लक आहे.

तसेच शासन निर्णय क्र. पीआरई – 2006/(4767)/प्राशि-1, दि.16.12.2009 अन्वये सन 2009-2010 या वर्षापासून पुढे प्राथमिक शिक्षणसेवक भरती प्रक्रिया केंद्रीय भरतीपूर्व निवड परीक्षेद्वारा राबविण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित निर्णय घेण्याचे निर्देशित केलेले आहे.

१. **शिक्षण सेवकाची नियुक्ती :-** जिल्हा परिषदा/ महानगरपालिका (मुंबई महानगरपालिका वगळून)/नगरपालिका/नगरपरिषदा मधील शिक्षण मंडळे व कटक मंडळे इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठिकाणी मंजूर असलेल्या प्राथमिक शाळातील शिक्षकांच्या पदांपैकी त्यापुढील वर्षीच्या दि.31 मे पर्यंत रिक्त होणा-या शिक्षकांच्या पदावर दरवर्षी शिक्षणसेवकांची केंद्रीय भरतीपूर्व निवड परीक्षेद्वारे निवड करण्यात येईल.

२. **शिक्षण सेवकाच्या मुलाखत व कागदपत्र पडताळणीसाठी समिती** – दि. 27.02.2003 च्या शासन निर्णयामध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील. सदर समितीने गुणवत्ताधारक उमेदवारांच्या मुळ कागदपत्राची तपासणी करावी. मुलाखतीसाठी कोणतेही गुण देण्याची तरतूद नाही.

३. **शिक्षण सेवकाच्या निवडीसाठी दरवर्षी करावयाची कार्यपद्धती** – सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्या आस्थापनेवर जेवढी प्राथमिक शिक्षणसेवकाची पदे भरावयाची आहेत, त्यांची 30 सप्टेंबरच्या संच मान्यतेनुसार त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या 31 मे पर्यंत (मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या पदांसह) रिक्त होणा-या पदांची संख्या विचारात घेऊन माध्यमनिहाय शिक्षण सेवक पदासाठी मागणीपत्र, संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे वेळापत्रातील तारखेप्रमाणे पाठवावे.

तथापि, महापालिकेची सध्या आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे सदरील सहशिक्षक या अभिनामाची रिक्त पदे भरती केली गेली नाहीत. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, आस्थापनेवर रिक्त असलेल्या सहशिक्षक या पदाचा गोषवारा मा.शिक्षण आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना पाठविण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी कार्यालयीन पत्र जा.क्र. नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-7/8793/15, दि.09.10.2015 अन्वये अनुशेषानुसार शिल्लक असलेली रिक्त पदे प्राधान्याने भरण्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध करून देण्यात यावे असे पत्र पाठविण्यात आले. त्यानुसार उमेदवार प्राप्त होताच सदरील पदे भरण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, ही सदरची बाब सर्व साधारण सभेच्या निर्दशनास आणुन द्यावी.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.७८** **ठराव**

नांवामनपा अंतर्गत मनपाच्या मराठी माध्यमाच्या ६ शाळा,उर्दू माध्यमाच्या ६ शाळा,संयुक्त (मराठी व उर्दू) माध्यम ३ अशा एकूण १५ प्राथमिक शाळा आहेत. सदरील शाळांमध्ये मराठी माध्यम पदविधर १, सहशिक्षक ५, उर्दू माध्यम सह शिक्षक ४ अशी पदे रिक्त आहेत. सदर पदासाठी शासनामार्फत ५० टक्के अनुदान प्राप्त होते.

मनपा शाळामध्ये बहुतांश गोरगरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात शिक्षकांच्या कतरतेमूळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी त्या अनुषंगाने सदरील पदे त्वरीत भरण्याची कार्यवाही आयुक्तांनी करावी असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.१४** **प्रस्ताव**

नांवामनपाकेतर्फे बाहयरुग्ण विभाग-१२, आंतररुग्ण विभाग -२, चालतात, आरोग्याविभागामध्ये खालील प्रमाणे रिक्त पदे आहेत.

**राष्टीय शहरी आरौग्य अभियान अंतर्गत**

वैद्यकिय अधिकारी – ४,स्टॉफ नर्स -४ , नर्स (एएनएम)-२ व चतुर्थश्रेणी कर्मचारी -४

**राष्टीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम**

S.T.L.V.-1, T.B.M.V. -2 ,लॅब टेक्नीशियन -4 , लिपिक -1

**हिवताप विभाग (मलेरिया)**

वरिष्ठ क्षेत्रिय अधिकारी -२ चतुर्थश्रेणी कर्मचारी -१४, सुपरवायझ्रर -२

वरील तिन्ही योजनेसाठी शासनातर्फे १०० टक्के अनुदान प्राप्त होते . व सदरील पदे भरल्यास महानगरपालिकेवर आर्थिक भार पडणार नाही. सदरील विभागात कर्मचारी नसल्यामूळे नागरीकांची गैरसोय होत आहे .करीता वरील सर्व रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी मान्यता देणे बाबत.

**सुचक** :- सौ.सविता मारोतरा कंठेवाड **अनुमोदक** :- रजिया बेगम अयुब खॉ

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत मा. आयुक्त, कुटूंब कल्याण व संचालक राष्ट्रीय आरोग्य अथ्भयान यांचे परिपत्रक क्रं. राआसो/NUHM-Technical Staff/ मार्गदर्शक सुचना/३९१७५-३९९/१५ दिनांक १५.०९.२०१५ मधील तरतुदीनुसार वैद्यकिय अधिकारी व विशेषतज्ञ, स्टाफ नर्स, एलएचव्ही, एएनएम, औषध निर्माता व प्रयोगशाळा तंत्रज्ञ या रिक्त पदावर कौशल्य चाचणी, प्रात्यक्षिक चाचणी, प्रत्यक्ष मुलाखत, इत्यादी पध्दतीचा निवड प्रक्रियेत अवलंब करण्या बाबत नव्याने मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या आहेत त्यानुसार सदरील योजनेअंतर्गत सध्या रिक्त असलेली पदे भरण्या बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच मनपाकेतील रिक्त पदे विहीत पध्दतीचा अवलंब करुन भरण्यात येत असल्यामुळे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाण अंतर्गत, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम व हिवताप विभाग (मलेरिया) या योजनंतर्गत रिक्त पदाचा नव्याने आढावा घेवुन विहित पध्दतीचा अवलंब करुन सदरची रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.७९** **ठराव**

नांवामनपाकेतर्फे बाहयरुग्ण विभाग-१२, आंतररुग्ण विभाग -२, चालतात, आरोग्याविभागामध्ये खालील प्रमाणे रिक्त पदे आहेत.

**राष्टीय शहरी आरौग्य अभियान अंतर्गत**

वैद्यकिय अधिकारी – ४,स्टॉफ नर्स -४ , नर्स (एएनएम)-२ व चतुर्थश्रेणी कर्मचारी -४

**राष्टीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम**

S.T.L.V.-1, T.B.M.V. -2 ,लॅब टेक्नीशियन -4 , लिपिक -1

**हिवताप विभाग (मलेरिया)**

वरिष्ठ क्षेत्रिय अधिकारी -२ चतुर्थश्रेणी कर्मचारी -१४, सुपरवायझ्र -२

वरील तिन्ही योजनेसाठी शासनातर्फे १०० टक्के अनुदान प्राप्त होते . व सदरील पदे भरल्यास महानगरपालिकेवर आर्थिक भार पडणार नाही. सदरील विभागात कर्मचारी नसल्यामूळे नागरीकांची गैरसोय होत आहे .करीता वरील सर्व रिक्त पदे त्वरीत भरण्याची कार्यवाही आयुक्तंनी करावी असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.१५** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री विलास मटपलेवार यांची आई मौनाबाई माधवराव मटपलेवार हयांची प्रक्रती ठिक नसल्याने त्यांना हैद्राबाद येथील अपोलो हॉस्पीटल येथे उपचार करण्यात आले त्यामुळे उपचाराअंती पित्ताशयात मोठया प्रमाणात खडे (Stone in Glabladder) असल्याचे निदर्शनास आले व सदरील पित्ताशयातील खडे काठण्यासाठी ERCP करून शस्त्रक्रीया करणे अत्यंत गरजचे होते त्यामुळे अपोलो हॉस्पीटल येथे पित्ताशयातील खडे (ERCP व शस्त्रक्रीया) काठण्यासाठी शस्त्रक्रीया व इतर खर्च असे एकुण ५.०० लक्ष इतका खर्च झालेला आहे श्री विलास मटपलेवार यांची आर्थीक परिस्थिती साधारण असल्याने त्यांनी सदरील खर्च उसणवारी करून केलेला आहे त्यामूळे श्री विलास मटवपलवार यांनी त्यांचे आईच्या उपचाररसाठी केलेला खर्च रु.५.०० लक्ष हा महापालीकेतर्फे आर्थीक मदत देण्यास ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** उमेश पवळे **अनुमोदक :-** आनंद चव्हान , श्रीनीवास सातोलीकर

**प्रशासकीय टिप्पणी**

महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकिय बिलांची प्रतिपुर्ती करणेसाठी महानगरपालिकेतील अधिका-याची समिती गठित करण्यात आलेली असून सदर समितीचा अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. समितीचा अहवाल सादर झाल्यानतर सर्व कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी वैद्यकिय बिलांच्या मर्यादा निश्चित होइल त्यानुसार निर्णय घेण्यात येइल.

तुर्त संबंधितास प्रस्तावातील मागणीनुसार वैद्यकिय बिलाची प्रतीपुर्ती करता येणार नाही.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो .नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ८०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री विलास मटपलेवार यांची आई मौनाबाई माधवराव मटपलेवार हयांची प्रक्रती ठिक नसल्याने त्यांना हैद्राबाद येथील अपोलो हॉस्पीटल येथे उपचार करण्यात आले त्यामुळे उपचाराअंती पित्ताशयात मोठया प्रमाणात खडे (Stone in Glabladder) असल्याचे निदर्शनास आले व सदरील पित्ताशयातील खडे काठण्यासाठी ERCP करून शस्त्रक्रीया करणे अत्यंत गरजचे होते त्यामुळे अपोलो हॉस्पीटल येथे पित्ताशयातील खडे (ERCP व शस्त्रक्रीया) काठण्यासाठी शस्त्रक्रीया व इतर खर्च असे एकुण ५.०० लक्ष इतका खर्च झालेला आहे श्री विलास मटपलवार यांची आर्थीक परिस्थिती साधारण असल्याने त्यांनी सदरील खर्च उसणवारी करून केलेला आहे त्यामूळे श्री विलास मटवपलेवार यांनी त्यांचे आईच्या उपचाररसाठी केलेला खर्च रु.५.०० लक्ष हा महापालीकेतर्फे आर्थीक मदत देण्यास ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री रमेश हैबते यांची आई राधाबाई माधवराव हैबते हयांची प्रक्रती बिघडल्यामुळे शहरातील खाजगी रूग्णालयात उपचार करण्यात आले त्यामध्ये पित्ताशयात मोठया प्रमाणात खडे (Stone in Glabladder) असल्याचे निदर्शनास आले व सदरील पित्ताशयातील खडे काठण्यासाठी ERCP करून शस्त्रक्रीया करणे अत्यंत गरजचे होते त्यामुळे अपोलो हॉस्पीटल येथे पित्ताशयातील खडे (ERCP व शस्त्रक्रीया) काठण्यासाठी शस्त्रक्रीया व इतर खर्च असे एकुण ८.८० लक्ष इतका खर्च झालेला आहे श्री रमेश हैबते यांची आर्थीक परिस्थिती बिकट असल्यामूळे त्यांनी सदरील हा नातेवाईक व मित्रमंडळीकडून उसणवारी करून केलेला आहे त्यामूळे श्री रमेश हैबते यांनी त्यांचे आईच्या उपचाररसाठी केलेला खर्च रु.८.८० लक्ष हा महापालीकेतर्फे आर्थीक मदत देण्यास ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** उमेश पवळे **अनुमोदक :-** श्रीनीवास सातोलीकर

**प्रशासकीय टिप्पणी**

महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकिय बिलांची प्रतिपुर्ती करणेसाठी महानगरपालिकेतील अधिका-याची समिती गठित करण्यात आलेली असून सदर समितीचा अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. समितीचा अहवाल सादर झाल्यानतर सर्व कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी वैद्यकिय बिलांच्या मर्यादा निश्चित होइल त्यानुसार निर्णय घेण्यात येइल.

तुर्त संबंधितास प्रस्तावातील मागणीनुसार वैद्यकिय बिलाची प्रतीपुर्ती करता येणार नाही.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो .नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.८१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री रमेश हैबते यांची आई राधाबाई माधवराव हैबते हयांची प्रक्रती बिघडल्यामुळे शहरातील खाजगी रूग्णालयात उपचार करण्यात आले त्यामध्ये पित्ताशयात मोठया प्रमाणात खडे (Stone in Glabladder) असल्याचे निदर्शनास आले व सदरील पित्ताशयातील खडे काठण्यासाठी ERCP करून शस्त्रक्रीया करणे अत्यंत गरजचे होते त्यामुळे अपोलो हॉस्पीटल येथे पित्ताशयातील खडे (ERCP व शस्त्रक्रीया) काठण्यासाठी शस्त्रक्रीया व इतर खर्च असे एकुण ८.८० लक्ष इतका खर्च झालेला आहे श्री रमेश हैबते यांची आर्थीक परिस्थिती बिकट असल्यामूळे त्यांनी सदरील हा नातेवाईक व मित्रमंडळीकडून उसणवारी करून केलेला आहे त्यामूळे श्री रमेश हैबते यांनी त्यांचे आईच्या उपचाररसाठी केलेला खर्च रु.८.८० लक्ष हा महापालीकेतर्फे आर्थीक मदत देण्यास ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१७** **प्रस्ताव**

नागरी दलित वस्ती सुधार योजना २०१२-२०१३ मधील रु.६४.०० लक्षाची जी कामे परत गेलेली आहेत ती कामे चालू वर्षाच्या सदरील निधीमध्ये घेण्यासाठी ही सर्वसाधारण सभा मान्यता देते.

**सुचक :-** संजय गंगाधर मोरे **अनुमोदक:-** सौ. वैजयंती भि. गायकवाड

**आयुक्त** नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या कामांना ज्या आर्थिक वर्षात निधी मंजुर करण्यात येतो त्यामंजुर निधीतून मान्यता देण्यात आलेली कामे त्याच आर्थिक वर्षात केली नाही तर घेण्यात आली नाहीतर निधी व्यपगत होतो.

**महापौर** स.सदस्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो .निमयानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.८२** **ठराव**

नागरी दलित वस्ती सुधार योजना २०१२-२०१३ मधील रु.६४.०० लक्षाची जी कामे परत गेलेली आहेत ती कामे चालू वर्षाच्या सदरील निधीमध्ये घेण्यासाठी ही सर्वसाधारण सभा मान्यता देते.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.
शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | .नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. |